९८८०३

# घेतलं शिंगावर

मनोहर काटदरे




IRBK-0119803

वामन मोडक

नाटक
१९८०३
वाघनाकदारीण

१९८०३
नाटक

मराठी ग्रंथ संग्रहालय - ठाणे

# घेतलं शिंगावर

मनोहर काटदरे

IRBK-0119803

IRBK-0119803

मूल्य दहा रुपये

मॅजेस्टिक बुक स्टॉल

© सौ. मीरा काटदरे
१३ अमर कुंज, वीर सावरकर मार्ग
मुंबई २८

---

पहिली आवृत्ती : जानेवारी १९७१
दुसरी आवृत्ती : जुलै १९७६
तिसरी आवृत्ती : फेब्रुवारी १९८२

नाट्य परीक्षण मंडळ : डी. आर्. एम्. १३६१ : ७०

प्रकाशक
केशव विष्णु कोठावळे
मॅजेस्टिक बुक स्टॉल
गिरगाव नाका, मुंबई ४

मुद्रक
अ. के. कोठावळे
ॐ मुद्रणालय
२५० अ, शनिवार पेठ
पुणे ३०

दामू केंकरे यांस–

आपलं असंच– असू दे

प्रथम प्रयोग डॉ. अ. ना. भालेराव यांच्या स्मृतिदिनप्रसंगी मुंबई मराठी साहित्य संघ– नाट्यशाखेने मंगळवार दिनांक २५ ऑगस्ट १९७० रोजी रात्रौ ८॥ वाजता डॉ. अ. ना. भालेराव नाट्यगृहात सादर केला. प्रथम प्रयोगाचे मानकरी—

---

'घेतलं शिंगावर'

लेखक – मनोहर काटदरे

दिग्दर्शन व नेपथ्य – दामू केंकरे

कलावंत (प्रवेशानुक्रमे)

सदानंद – नारायण पै

सविता – सुलभा देशपांडे

सज्जन – अविनाश मसुरेकर

मुलगा – प्रवीण देवस्थळी

मधू – मीना सुखटणकर

म्हातारा – विनायक जोशी

बॉस – राघवेंद्र चौहान

मृदुला – ललिता केंकरे

वाकणकर – रमाकांत देशपांडे

हवालदार – अविनाश इंगळे

रंगभूषा – नाना जोगळेकर

रंगमंच व्यवस्था – बाळ बापट, अनंत जोशी, कृष्णकांत जाधव, सुधीर ठाकूर.

म. ग्रं. सं. ठाणे,

# अंक पहिला

[ वेळ शनिवार दुपारची. किंवा संध्याकाळची म्हणा. चार वाजण्याचा सुमार. गिरगावातील एक ब्लॉक. एकूण सुखवस्तू कुटुंबाची कल्पना यावी अशी ब्लॉकची रचना. कुटुंबात दोनच माणसं. सदानंद नि सविता.

पडदा उघडतो तेव्हा सदानंद झोपलेला. एकदा या कुशीवरून त्या कुशीवर वळतो. परत शांत. आतून सविता येते. तिचा हिशेब जमत नाही. ]

सविता : नवासत्ते बासष्ट—नवासत्ते बासष्ट— जळ्ळा मेला हिशेबच जमत नाही हा. अहो ऽ अहो ऽ — जरा बघता काहो ?

सदानंद : हं—

सविता : अर्धा तास डोकेफोड केली. आता खरंच डोकं फुटून जाईल. जरा बघता ?

सदानंद : अं-- ? हं हं— ( नुसता या कुशीवरून त्या कुशीवर वळतो. )

सविता : अहो— असं काय करता ? जरासुद्धा कशी दया येत नाही तुम्हांला ? अहो, ऐकताय का तुम्ही ?

सदानंद : होय— ऐकतोय — बोल.

सविता : बोल काय ? मी मॅड होऊन जाईन म्हटलं.

सदानंद : तू मॅड ? आणखी... ? का ?

सविता : तुम्ही आधी कॉटवरून उठा पाहू.

सदानंद : हां-- हां— आलं लक्षात. मी उठतो — त्याचं काही नाही. जरा दोन मिनिटं पडेन म्हटलं—

सविता : दोन मिनिटं ? अहो, चांगले दोन तास पडून आहात कॉटवर.

सदानंद : दोन तास ? दोन तास ? मी घरी आलो सव्वादोन वाजता. आता वाजतायत चार. म्हणजे किती वेळ झाला ?

सविता : आधीच माझं डोकं फिरलंय हिशेबानं, आणखी गणित कसलं घालताय ? इश्श्य !

सदानंद : तुझं ते अय्या, इश्श्य बंद करून टाक बघू. नॉनसेन्स. आणि तुला काय गणित घातलंय मी ? चार मायनस सव्वादोन हे काय गणित ?

सविता : गणित नव्हे ना— मग सांगा बघू उत्तर.

सदानंद : हॅ— त्यात काय मोठं ? फोर मायनस टू अ‍ॅण्ड क्वार्टर— म्हणजे आपलं— पण तू भलत्या वेळी भलतंच विचारतेस—

सविता : कळलं— कळलं—

सदानंद : कळलं— काय कळलं ? तू उगीच मला चिडवू नकोस हं. मला काय चार उणे सव्वादोन सांगता येत नाही ?— हॅ !

सविता : मग सांगा—

सदानंद : नाही सांगणार— आयला, धिस इज टू मच, फुकट डोकं फिरवते. जरा रेस्ट घेईन म्हटलं तर सुरू कटकट. म्हणे हिशेब बघा.

सविता : त्यात कटकट कसली ? माझं डोकं फिरलं म्हणून—

सदानंद : माझं फिरवतेस ? तुम्ही बायका म्हणजे खरंच ग्रेट—

सविता : हे बघा— सांगायचं नसेल तर सांगू नका, पण तुमचं लेक्चर नको बायकांच्यावरचं नेहमीचं.

सदानंद : विल यू प्लीज स्टॉप नाऊ ?

सविता : अहो, असे चिडताय काय उगीचच ?

सदानंद : उगीचच ? वारे साळसूद ! म्हणे नेहमीचं लेक्चर नको.— मी नेहमी लेक्चर देतो काय ? ऐकणाराला काय वाटेल ?

सविता : वाटू दे. पण तुम्ही चिडू नका. तुम्ही चिडलात ना की— की एकदम शूर पुरुष वाटता इतिहासातले— ( ती त्याच्या जवळ जाते— खूप जवळ— तो विरघळतो. )

सदानंद : नॉनसेन्स— ( कॉटवर जाऊन बसतो. )

सविता : हं— आता तुम्ही छान दिसता— शांत बसल्यावर.

सदानंद : ( भिंतीवरील चित्राकडे पाहून ताडकन उठून ) आणि हे काय — ?

सविता : काय झालं हो— ?

सदानंद : दिसत नाही ? हे— हे चित्र इकडे कुणी लावलं ?— हजार वेळा तुला सांगितलं असेल— चित्रांच्या जागा बदलू नको म्हणून—

सविता : पण मी नाही बदलत—

सदानंद : खोटं बोलू नको वर— दोन महिने झाले चित्र आणून— तेव्हापासून नेहमी बघतोय मी— मी हे चित्र इकडे लावतो नि ते तिकडे. पण पुन्हा हळूच केव्हा तरी तू बदलून ठेवतेस—

सविता : अहो, म्हटलं ना मी नाही बदलीत म्हणून—

सदानंद : मग कोण भूत येतं जागा बदलायला. काही तरीच. घरात आपण दोनच माणसं— नि तरी तू बेधडक सांगतेस मी नाही बदलीत म्हणून— ( सदानंद उठतो. उजव्या बाजूचे चित्र काढून डाव्या बाजूला व डाव्या बाजूचे उजव्या बाजूस लावतो. ) हं, बघ आता. हाऊ नाइस ! पुन्हा हलवू नको आता. साधी सिमिट्री कळत नाही.

सविता : ( हसत ) अहो, ते उलटं लावलंत...

सदानंद : उलटं कुठे ? तुला मासा दिसत नाही ?

सविता : अय्या— मासा कसला ? अहो बाई आहे ती !

सदानंद : अय्या— मासा कसला ? चक्क लिहिलंय " फिश आऊट ऑफ वॉटर " म्हणून— जरा वाचून बघ—

सविता : अहो, पण फिश म्हणजे बाईच— तुम्हीच बघा. ( सदानंद चित्राजवळ जातो. वाचण्याचा प्रयत्न करतो. पण अक्षरं उलटी असतात. चित्र सुलटं करतो. )

सदानंद : सॉरी हं. उलटं लागलं होतं चित्र. अक्षरं उलटी दिसली म्हणून कळलं. मी समजतोय हे सुलटच आहे. आणि काय ग, हे इतके दिवस नाही बोललीस ते ?

सविता : काय ?

सदानंद : ते फिश म्हणजे बाई म्हणून.

सविता : मला वाटलं तुम्हाला माहीत आहे. एवढं हौशीनं आणलंत—

सदानंद : अग, आणलं म्हणजे काय ? कुणी आलं तर आपलं वाटलं पाहिजे की, आपल्याला टेस्ट आहे म्हणून— काय ?

सविता : हे पण आता नीट बघून ठेवा— नाही तर परत म्हणाल मीच बदललं म्हणून— (परत ती आपला हिशेब पाहू लागते.) तर तर-- नवा सत्ते बासष्ट— बासष्ट—

सदानंद : बासष्ट नव्हे— त्रेसष्ट.

सविता : कसे ?

सदानंद : कसे काय ? नवासत्ते त्रेसष्टच—

सविता : कशावरून पण ?

सदानंद : हत्ती घोड्यावरून— एवढी तू ही असशील असं वाटलं नव्हतं. इकडे ये. (खिशातून काड्याची पेटी काढतो.) ही काड्याची पेटी— या काड्या— मोज. या नऊ— ठेव अशा. परत नऊ. परत नऊ अशा सात वेळा— आणि बघ मोजून.

सविता : मी का मोजू? तुम्ही मोजा.

सदानंद : कमाल झाली तुझी. म्हणजे तूच म्हणतेस, नवासत्ते बासष्ट, आणि काड्या मी मोजू?

सविता : तुम्ही पण म्हणता, नवासत्ते त्रेसष्ट म्हणून.

सदानंद : अग, पण माझं बरोबर आहे.

सविता : कशावरून ?

सदानंद : आयला, आता मात्र वैताग आला.

सविता : चिडू नका. आपण शांतपणे बोलू या. वैतागून प्रश्न सुटत नसतात. तर मी म्हणते नवासत्ते बासष्ट— तुम्ही म्हणता त्रेसष्ट. म्हंजे हा वादाचा मुद्दा. बरोबर कोण हे ठरवायचं. मग काड्या मी का मोजायच्या ? आणि दुसरं म्हणजे या पेटीत फक्त पन्नास काड्या आहेत असं लिहिलंय. मग कशा मोजणार ?

सदानंद : दुसरी पेटी आण—

सविता : पण त्यात पण पन्नास काड्या असणार—

सदानंद : काय ग, तुझं डोकं आहे की खोकं ? दुसऱ्या पेटीत पन्नासच काड्या असल्या तरी दोन्ही पेट्या मिळून शंभर होतीलच की नाही ? मग आपल्याला पाहिजे तेवढ्या घेता येतील— बासष्ट किंवा त्रेसष्ट—

सविता : सॉरी हं— हे लक्षात नव्हतं आलं माझ्या— पण—

सदानंद : आता काय आणखी ?

सविता : घरात आता दुसरी पेटी नाय्य ऽ ऽ

सदानंद : घरात दुसरी पेटी नाही ! काय संसार आहे की आहे काय ?

सविता : पुन्हा डोक्यात राख घातलीत. घरात काड्याच्या पेट्या किती यावरून संसार कसा ते ठरवायचं असेल, तर उद्या सात हजार पाचशे बावन्न पेट्या आणते—मग काय म्हणाल ?

सदानंद : माझे आई— तुला प्रणिपात असो—

सविता : पण त्यानं उत्तर नाही मिळणार, नवासच्चे किती ते—

सदानंद : ए– आता हा गाढवपणा बस्स झाला हं–

सविता : तुमचे मुद्दे संपलेले दिसतायत— शिव्या द्यायला लागलात ते.

सदानंद : शिवी ? आयला, ‘ गाढव ’ ही काय शिवी ?

सविता : पुन्हा तेच-- कुठं शिकलात असं बोलायला— दुसरी शिवी—

सदानंद : आयला...म्हंजे ही पण शिवी ? अग, परवा तुझी कोणशी ती मैत्रीण आली होती ना— ती सुद्धा म्हणाली, आयला, काय मस्त पिक्चर होतं मीनाकुमारीचं म्हणून.

सविता : ती म्हणाली असेल. तुम्ही नका म्हणू. असे कसे हो तुम्ही बदललात. ( तिला हुंदका. )

सदानंद : ए...ए...अग, रडतेस काय ? रडू नको. तू रडलीस की मला कसं तरी होतं ! पूस डोळे बघू. आता नाही म्हणणार ‘ आयला ’ हं ! आतां कशी छान दिसतेस तू.

सविता : इश्श ! चला—

सदानंद : खरंच. आता मुळीच भांडणार नाही मी. नाही तरी आपण उगीचच भांडतो नाही ? आता आपण मस्त असं काही तरी बोलू या हं !

सविता : अं — हं !

सदानंद : काय बरं बोलायचं ? हं— आपण आपल्या घरासंबंधी बोलू या— बोरिवलीच्या. तिथं बाग कशी करायची वगैरे – हं ? ए, आपण मस्त गुलाब लावू या तिथं. निरनिराळ्या जातींचे. पंडितजींना फार आवडायचा गुलाब. फूल आणि मूल ! मजा नाही का ? नाही तरी दर शनिवारी रविवारी तिथं काय करायचं, प्रश्न असतो. बाग केली म्हणजे वीक एंड चांगला जाईल.

सविता : नाही तर असं करू या का? आपण तिकडेच राहू मोकळ्या हवेत. फक्त शनिवारी-रविवारी इकडे येऊ. जरा चेंज म्हणून.

सदानंद : हट्– हे भलतंच नाही जमायचं. बोरिवलीहून ऑफिसला यायचं म्हणजे वैतागच — नि शिवाय सुटी इथं काढायची गिरगावात– आयला म्हणजे मरणच सालं!

सविता : काय म्हणालात?

सदानंद : नाही तर काय? आपण करतो तेच बरोबर. आठवडा इथं, शनिवार –रविवार बोरिवली.

सविता : ते नाही. परत शिवी आली.

सदानंद : आली असेल. फार काटेकोरपणे पाहू नको. हल्ली हे कॉमन झालंय. आणि घरातसुद्धा कोर्टातल्यासारखं बोलायचं म्हंजे कठीणच. तू इतकं लक्ष देऊ नको. तू आपलं आटप बघू लवकर. नाही तर लावशील आणखी तास–

सविता : कशाला?

सदानंद : तुझं आटपायला.

सविता : म्हंजे कुठं जायचंय आपल्याला?

सदानंद : आता मात्र खरंच कमाल झाली हं डिंगो—

सविता : डिंगो नका म्हणू—कुत्र्याचं नाव आहे ते.

सदानंद : पण मला डिंगोच म्हणायला आवडतं–

सविता : पण मला नाही आवडत.

सदानंद : नाही तर नाही. पण तू चिडू नकोस. तू चिडलीस ना की–

सविता : फार छान दिसतेस—

सदानंद : तसं नाही ग– पण परत विषय चालला वाहात. तुझी खरंच कमाल आहे. आज वार कुठला तो तरी आठवतोय?

सविता : शनिवार.

सदानंद : आपल्या लग्नाला किती वर्षं झाली?

सविता : झाली असतील तीन साडेतीन—

सदानंद : म्हंजे तुला तेसुद्धा आठवत नाही!

सविता : आठवतं हो– त्याचं काय?

सदानंद : लग्न झाल्यापासून दर शनिवार–रविवार आपण कुठं असतो?

सविता : कुठं ?

सदानंद : बघ, अजून तू चिडलेलीच— अग, आपलं ठरलेलंच नाही का की आठवडा इथं नि सुटी बोरिवलीला म्हणून ?

सविता : असेल.

सदानंद : असेल काय ? आता गाढवासारखा वेळ घालवू नकोस. नवासचे बासष्ट करीत– नाही तर पोचायला रात्रीचे दहा वाजतील.

सविता : वाजू देत.

सदानंद : हे बघ जास्त शहाणपणा करू नकोस.

सविता : गाढवं गाढवपणा करतात.

सदानंद : काय वैताग देतेस तू. हे फारच झालं. अग ऊठ. बसून काय राहिलीस ! ए...

सविता : मी येणार नाही.

सदानंद : येणार नाही म्हंजे ?

सविता : म्हंजे आय ॲम नॉट कमिंग वुईथ यू. मैं आपके साथ नहीं आऊंगी. हूं तमारे साथे–

सदानंद : पुरे, पुरे. पण का ?

सविता : माझी मर्जी—

सदानंद : तुझी मर्जी ? हे काय नवीन लचांड ? काय ग, तुझं डोकंबिकं फिरलंय काय ? लग्न झाल्यापासून एकदाही अशी वागली नव्हतीस, नि आज–

सविता : मी येणार नाही–

सदानंद : जास्त शहाणपणा करू नको.

सविता : पुन्हा पुन्हा धमकी देऊ नका. धमक्यांनी प्रश्न सुटत नसतात. गुंतागुंत वाढते. शिवाय—

सदानंद : तुझं तत्त्वज्ञान नकोय मला––

सविता : राहिलं. ( थोडा वेळ शांतता. )

सदानंद : मग तू येणार की नाही ?

सविता : नाही...

सदानंद : चक्क नाही म्हणून सांगतेस ? मग मी ?

सविता : एकटे जा––

सदानंद : हे तू सांगतेस ? तुला काही वाटत नाही ?

सविता : वाटतंय की, आपण एकटं राहावं--

सदानंद : मग तू येत नाहीस ? तू येत नाहीस ? तू येत नाहीस ना ? मग मी पण जात नाही--

सविता : किती वैताग देता हो- तुम्हाला जायचंय-- जा.

सदानंद : मी जाणार नाही--

सविता : तुम्ही जा...जा...

सदानंद : मी नाही जाणार. तू का येत नाहीस हे कळलंच पाहिजे मला.

सविता : कित्ती हट्टी आहात तुम्ही पण. मला एकटीला सुखानं दुःखसुद्धा भोग देत नाही. म्हणे मला कळलंच पाहिजे. ऐका मग. ही बाई पाहिलीत चित्रा-तली. फिश आऊट ऑफ वॉटर. पाण्याबाहेरची मासोळी-- तडफडणारी-- कशाला आली असेल बाहेर ? प्रियकराला भेटायला ? की बछड्याला कुशीत घ्यायला ? की राक्षसाच्या तावडीतून त्याची सुटका करायला ? पाण्यांत राहून वाट पाहून कंटाळली असेल ती, वाटलं असेल- तोडावे हे सगळे पाश- जावं बाहेर सगळ्या चौकटी तोडून- मग घेतली असेल झेप. त्या क्षणाला असेल- फक्त एकच धुंदी- त्या झेपेची- तो एक क्षण सर्वस्व पणाला लावून जगली असेल- मग कळलं असेल की हे जग आपलं नाही- इथं श्वाससुद्धा घेता येणार नाही- इथं राहायचं तर फक्त मरण-- मग सुरू झाली ती तडफड... परत पाण्यात जायची- इतक्या जवळून मृत्यूचं रूप पाहिलं असेल तिनं- मला पण दिसतोय तो एकच क्षण- झेपेचा- कंटाळा आलाय... या बेचव आयुष्याचा- वाटतंय की ही सगळी चौकट फेकून द्यावी नि काही तरी निराळं जगावं- देअर मस्ट बी सम थ्रिल इन लाईफ.

सदानंद : ए, तू काय बोलतेस काय ? डॉक्टरला बोलवू का ? शुद्धीवर आहेस ना ? मला माहीत नव्हतं तुझ्यावर एवढा परिणाम होईल चित्राचा. मी आणलं नसतं. ( ती नुसती हसते. ) हसतेस काय ? चल, आटप बघू.

सविता : मी सांगितलं ना मी येणार नाही म्हणून--मला एकटीला राहू द्या.

सदानंद : आयला-- धिस इज टू मच ! तुला भेटायला नाही येणार कुणी प्रियकर किंवा कोण तो -- पाण्यातून झेप घेऊन--

सविता : मला जास्त चिडवू नका.

सदानंद : का ? काय करशील ?

[ ती बोलत नाही— सरळ उठते— त्याची भरलेली बॅग उचलते— गॅलरीतून टाकून देणार तोच— ]

सदानंद : हे काय ? बॅग भरलेली आहे— नॉनसेन्स. (तिच्या हातातून बॅग हिसकावून घेतो.) तुला मी जायला पाहिजे ना ? एकटा जातो— तू बस प्रियकराची वाट पहात, नाही तर थ्रिल शोधीत. (तो बाहेर जाणार एवढ्यात फोन वाजतो.) हॅलो--होय- झुंजार- हो- एस्. एम्.—काय ?- ऑफिसचं काम ऑफिसमध्ये— घरी मी ऑफिसचं बोलत नाही— बॉस ! बॉस गेला खड्ड्यात— थँक्यू. (फोन आपटतो. सविताला 'वुइश यू बेस्ट ऑफ लक' म्हणतो नि दाणदाण पावलं आपटीत जातो.)

[ जरा वेळाने मोटार सुरू केल्याचा आवाज ]

सविता : अय्या, खरंच गेले. अगदी जाम चिडलेत हं. मनात नक्की म्हणत असतील 'असा धडा शिकवतो.' पण मी तरी काय करणार हो- मी काही हिऱ्याची कुडी मागितली नव्हती. म्हटलं जरा एकटं रहावं— तेवढंच जरा थ्रिल. सगळ्या नवऱ्यांचं मला वाटतं असंच. बायको जवळ असली की यांना वाटतं आपण पुरुषोत्तम. आणि बायको म्हणजे पायाची दासी- आणि शिवाय सुखाचा सुद्धा तसा कंटाळा येतो कधी कधी— म्हणून आज जरा भांडले— आता मजा हं. आता मी एकटी— ए...जरा हे दे— जरा... ते दे म्हणायला कोणी नाही. स्वातंत्र्य— संपूर्ण स्वातंत्र्य- १५ ऑगस्ट १९४७— मजाच मजा. तुम्हाला कल्पना असेलच.. पण या नवऱ्यांचं प्रेम म्हणजे सुद्धा कधी कधी वैताग असतो—त्यातून सुटायचं म्हणजे—उगीच नसतं. पूर्वी बायकांना माहेरी पाठवीत— महिनाभर विरह ! गंमत असेल नाही ? नवऱ्याचा कंटाळा आला म्हणून दाखवायचं— लांब रहायचं नि सारखी नवऱ्याची आठवण काढायची. तीन वर्षांनी प्रथमच एवढा एकटेपणा. आता मात्र यांची आठवण काढायची नाही— निदान दीड दिवस तरी— मनाला वाटेल तसं वागायचं. फरगेट द पास्ट— डोन्ट थिंक ऑफ फ्युचर. टेक द प्रेझेंट. टेक लाइफ अॅज इट कम्स. आता फक्त मजा. (टेलिफोन नंबर फिरवते.) हॅलोऽऽ हॅलो— सुशे, अग मी सवी. आठवण ना ? आज तुझीच करायची. एकटी आहे मी. हो ना— चल चावटपणा नको. हो- तू ये- पण लवकर हं. आय अॅम फ्री.

भेटल्यावर ठरवू. नक्की ये हं. मी वाट पाहाते. (टेलिफोन ठेवते. नंतर काय करावं सुचत नाही. एक पुस्तक घेते नि आतल्या खोलीत जाते. ती गेल्यावर बाहेरचं दार उघडून एक माणूस आत येतो. अर्थातच त्याच्याजवळ ब्लॉकची किल्ली आहे. माणूस साधारणपणे २४–२५ वर्षांचा. थोडासा बुजरा वाटणारा. तो आत येतो. हॉलमध्ये नजर टाकतो, डाव्या नि उजव्या बाजूची चित्रं पहातो. थोडासा वैतागतो. बूट काढतो. एक खुर्ची घेऊन उजव्या बाजूचं चित्र काढून टेबलावर ठेवतो. नंतर डाव्या बाजूचं चित्र काढून उजव्या बाजूला लावतो. या भानगडीत थोडासा आवाज होतो. तो ऐकून सविता बाहेर येते.)

सविता : अहो...अहो.. हे काय करता?

माणूस : ऑं, आय ॲम सॉरी.

सविता : ते ठीक आहे. पण चालवलंय काय तुम्ही?

माणूस : हे इकडचं चित्र तिकडे लावतोय. नि तिकडचं इकडे.

सविता : का?

माणूस : का म्हणजे? मला नाही आवडत हे चित्र इथं नि ते चित्र तिथं असलेलं, जागा बदलल्या की बरी दिसतात.

सविता : तुम्हाला कुणी सांगितलं हे करायला?

माणूस : सांगणार कोण? आपलं मीच करतो— नेहमीप्रमाणं—

सविता : नेहमीप्रमाणे म्हंजे?

माणूस : म्हंजे मी जेव्हा इथं येतो तेव्हा तेव्हा ही चित्रं अशीच असतात, मी त्यांच्या जागा बदलतो.

सविता : तुम्ही इथं येता? नेहमी?

माणूस : हो— का?

सविता : मला कधी दिसला नाहीत ते?

माणूस : तुम्ही पण मला दिसला नाहीत.

सविता : म्हंजे आम्ही नसताना तुम्ही इथं येता?

माणूस : असेल.

सविता : म्हंजे तुम्ही चोर! चोरून घरात शिरता आमच्या?

माणूस : तुमच्या? तुम्ही? तुम्ही आहात? कमाल आहे, वाटलं नाही तुम्ही असाल म्हणून. माझ्या लक्षातच नाही आलं. तुम्ही विचारीत राहिलात. मी

उत्तर देत राहिलो. वाटलं, माझा आतला आवाजच बोलत असेल. नेहमी-सारखा. म्हंजे काय आहे— की मी इथं आलो ना, की मला प्रथमच पाहिल्यावर घरमालक किंवा मालकीण काय म्हणेल याची उजळणी करतो. त्यामुळे घोटाळा झाला. मला कल्पनाच नव्हती खरंच तुम्ही इथं असाल म्हणून, मला माफ करा. आय ॲम रिअली सॉरी.

सविता : अरे वा...बरेच सभ्य दिसता की. चोर एवढे सभ्य असतात हे माहीत नव्हतं मला.

माणूस : तुम्ही बऱ्याच धीट दिसता की— मी चोर आहे हे समजूनसुद्धा धडाक्यानं बोलताय त्या.

(आता तिला एकूण परिस्थितीची कल्पना येते. एका चोरासमोर आपण उभ्या आहोत, या कल्पनेनं तिला कापरं भरतं, पण ती उसनं अवसान आणते.)

सविता : म्हंजे... खरंच तुम्ही चोर ? अग आई ग...

माणूस : बाई— उगीच आईला हाका मारू नका. ती येणार नाही. नि मला चोर वगैरे पण म्हणू नका.

सविता : वा.. हा परत दम ? दुसऱ्याच्या घरात चोरून शिरता— तिथलं सामान हलवता. नि वर दम देता ? तो पण मालकिणीला ? मी ओरडेन— जोरात ओरडेन— चो... र. (तिचा आवाज फुटत नाही.)

माणूस : बाई थांबा, मी चोर नाही. मी इथं चोरून आलेलो नाही. राजरोस आलोय. दिवसा— ही किल्ली लावून ब्लॉक उघडलाय.

सविता : किल्ली पण आहे तुमच्याकडे ? अग आई ग...

माणूस : आणि सामान हलवलं नाही. फक्त चित्रांची जागा बदलली मला त्रास होतो म्हणून.

सविता : अस्सं होय ? तुम्हांस त्रास होतो काय ? वारे वा...चोर तो चोर नि...

माणूस : बाई परत सांगतो. मला चोर म्हणू नका. तुम्हाला कायदा माहीत नसेल. पण इंडियन पीनल कोडाच्या ३७८ व्या कलमाप्रमाणे हू एव्हर इन-टेन्डींग टू टेक डिसऑनेस्टली एनी मुव्हेबल प्रॉपर्टी आऊट ऑफ द पझेशन ऑफ एनी पर्सन वुइथआऊट दॅट परसन्स कन्सेन्ट मुव्हज दॅट प्रॉपर्टी इन ऑर्डर टू सच टेकिंग, इज सेड टू कमिट थेफ्ट...काय ? (सविता बघतच

रहाते.) म्हंजे मी जरी चित्रांची हलवाहलव केली आणि ती वुइथआऊट युवर कन्सेन्ट असली तरी इन ऑर्डर टू सच टेकिंग नसल्यामुळे...

सविता : पुरे पुरे-- मला पाणी द्या, नको-- पण तुम्ही नको.

(ती फोन फिरवते- पोलिस-- पोलिस-)

माणूस : ते पाणी नाही देणार—

सविता : हॅलो-- पोलिस-- इथं चोर--

माणूस : हे बघा. पोलिसला वगैरे बोलवू नका. मी चोर नाही. मी जर चोर असतो ना तर (इथपर्यंत ती ऐकत नाही.) थांब, हात लावू नको फोनला- तू पोलिसला बोलावणार काय ? खबरदार-- हा पाहिलास सुरा ? साडे नऊ इंच लांबीचा. आरपार जाणारा. आतडी बाहेर काढणारा. एक क्षणात इथं पडशील तू रक्ताच्या थारोळ्यात. तू बोलाविलेल्या पोलिसाला दिसेल फक्त तुझं प्रेत. थंडगार-- रक्तात माखलेलं... ठरव नक्की टू बी ऑर नॉट टू बी- जगायचं की मरायचं. एकच क्षण आहे. मोलाचा.

सविता : नाही- मरायचं नाही मला. माझ्यावर दया करा. अजून खूप पाह्यचंय आयुष्यात.

माणूस : मग तू दूर हो फोनजवळून. याद राख गडबड केलीस तर. प्राणाशी गाठ आहे. तू एकटी आहेस ! माहीत आहे मला. मी म्हणतो तसं मान्य कर-- कबूल ?

सविता : कबूल. पण मला मारू नका हो. नका मारू. (ती त्याच्या पायाशी पडते. जवळ जवळ बेशुद्ध. त्याची हवा गेलेली.

माणूस : अहो हे काय ? बेशुद्ध झालात काय ? नुसत्या दमानं ? असं करू नका. अहो, अहो...असं करू नका हो. दया करा माझ्यावर. अहो, मी चोर नाही. सुराबिरा काही नाही माझ्याजवळ. तो कसा असतो ते नीट पाहिलं-सुद्धा नाही मी अजून. माझ्यावर ही भलती आफत आणू नका. अहो ऐकताय न तुम्ही ? मी खरंच चोर नाही हो. विश्वास ठेवा माझ्यावर.

सविता : चोर नाही ? खरंच ? देवाशपथ ?

माणूस : देवाशपथ नाही हो-- मी म्हटलं मी चोर असतो तर असं म्हटलं असतं-- पण मी तसं म्हणत नाही.

सविता : म्हंजे तुम्ही खरंच चोर नाही ?

माणूस : किती वेळा सांगू ? नाही-- नाही. खरा चोर आला तर माझी पण तुमच्यासारखीच गत होईल. विश्वास ठेवा माझ्यावर.

सविता : मग तुम्ही आहात कोण ?

माणूस : मी ? मी सज्जन.

सवित : काय सज्जन ?

माणूस : हो. का ?

सविता : नाही– तसे दिसत नाही तुम्ही--

माणूस : तसे म्हणजे ?

सविता : सज्जन असल्यासारखे–

माणूस : मग मी काय डाकू दिसतो ? ४२० दिसतो ? इतका गरिबासारखा वागलो तरी ? सुरा बाळगला नाही तरी ? काय वाटेल ते काय बोलता ? खरं तर पाहिल्याबरोबर तुम्ही ओळखायला पाहिजे होतं, की हा नक्की कारकून किंवा जास्तीत जास्त गुरुजी असेल म्हणून.

सविता : तसं नाही हो-- पण मला आपले तुम्ही निराळे दिसता.

माणूस : निराळा म्हंजे ?

सविता : आता काय सांगू ? अहो, प्रत्यक्षात तुम्ही खूप निराळे दिसता.

माणूस : तुम्ही काय शब्दकोडी सोडवता ?

सविता : का ?

माणूस : तसं बोलताय म्हणून— तुम्ही आहात तसे दिसत नाही. दिसता तसे नाही वगैरे. मी काय रामन राघवचा भाऊ वाटलो रूपं बदलायला ?

सविता : आता काय सांगू ? तसं नाही हो-- पण बीस साल बाद मधे खूप निराळे दिसला तुम्ही.

माणूस : ऑं ? हां हां. अहो, तो मी नाही. तो आपला सिनेमातला. मी खराच सज्जन. बाकी एक कमाल हं तुमची. चोर नाही म्हटल्यावर तुम्ही सिनेमानट समजलात.

सविता : आय ॲम सॉरी.

माणूस : ते ठीक आहे. पण आता मी तुम्हाला सगळं नीट समजावून सांगतो. तर मी सज्जन— सज्जन खरे.

सविता : खरे ? अय्या, काय गंमत आहे !

माणूस : त्यात कसली गंमत ? तुम्हाला काय वाटलं— खोटे असेल ?

सविता : तसं नाही हो. पण खरे म्हटल्यावर मला आपली माझी मैत्रीण आठवली. कुंदा माझी अगदी जीवश्च – कंठश्च मैत्रीण होती.

माणूस : होती ? अरेरे !

सविता : होती म्हंजे ती आहे. हिंगण्याला होती माझ्याबरोबर— सातवीत-आठवीत. गेल्या तेरा वर्षांत भेटलेली नाही. कुठं असते कुणाला ठाऊक.

माणूस : आणि ती तुमची जीवश्च मैत्रीण ? आनंद आहे.

सविता : ती तुमची कोण ? कुणी लागते ?

सज्जन : कुंदा– ? कुंदा खरे— हिंगणे. सातवी-आठवी. तेरा वर्षांपूर्वी— अं— अं हां हां कुंदा ? कुंदी म्हटलंत म्हणून लक्षात नाही आलं. ती ना ? ती माझी मावस बहीण.

सविता : काही तरीच काय सांगता ? मावसबहीण कशी असेल ? तिचं पण आडनाव खरेच की !

सज्जन : त्याचं काय आहे की, माझी मावशीसुद्धा खऱ्यांकडे दिली होती. आजोबांना आडनाव आवडलं असावं बहुधा. तर मी सज्जन खरे— दर शनिवार–रविवार नि सुटीच्या दिवशी मी इथं येतो. तुम्ही इथं नसता. तुम्ही येण्यापूर्वी निघून जातो.

सविता : पण इथंच का येता ?

माणूस : का म्हणजे ? राहायला. मला जागा नाही– तेव्हा–

सविता : अय्या ! मग आठवडाभर कुठं रहाता ?

माणूस : बोरिवलीला.

सविता : बोरि-लीला कुठं ?

माणूस : तुमच्याच जागेत.

सविता : म्हंजे कमालच आहे तुमची. तुम्ही चक्क आमच्या जागेत राहाता ? आम्हाला न सांगता ?

माणूस : सांगितलं असतं तर परवानगी दिली असतीत ?

सविता : नाही— ते बरोबरच आहे. पण तरी म्हणता की तुम्ही चोर नाही म्हणून !

माणूस : मघाशी म्हटलं ना, की इंडियन पीनल कोडच्या ३७८ व्या कलमाप्रमाणे

चोर म्हणजे...

सविता : ते नको— ते कळलंय. पण तुम्ही चक्क फुकट राहाता आपणच मालक असल्यासारखे—

माणूस : आता भाडं कुणी तरी भरलंच पाहिजे. तुम्ही भरता नि शिवाय आपल्याला भाडेकरू म्हणून राहायला नाही आवडणार. त्यापेक्षा चोर म्हटलं तरी चालेल. भाडेकरू म्हटलं की एकदम गिळगिळीत वाटतं.

सविता : खरंच तुम्हाला काही वाटत नाही काहो दुसऱ्याच्या घरात राहायला? चोरून?

माणूस : वाटेल ते बोलू नका– मी ऐकून घेतोय म्हणून. लक्षात ठेवा मी भाडेकरू नाही. शिवाय दुसऱ्याचं घर म्हंजे काय? तुम्ही राहाता— मी पण राहातो. कुटुंबातली सगळी माणसं भाडं थोडंच भरतात?

सविता : पण आम्ही तीन वर्षे राहातोय.

माणूस : मी पण तीन वर्षं राहातोय. पण हे बघा— आता जास्त वाद घालण्यात अर्थ नाही. तुम्ही इथं राहाता. मी पण राहातो. तुम्ही भाडं भरता याबद्दल पाहिजे तर मी तुमचे आभार मानतो. पण इतकी वर्षं मी इथं राहातो नि ते तुमच्या लक्षात आलेले नाही त्याअर्थी आपण एकाच कुटुंबातले असं मानायला हरकत नाही. इतक्या वर्षांत तुमचं काही सामान चोरीला गेलेलं नाही. निदान तसं तुमच्या लक्षात आलेलं नाही त्या अर्थी मी एक सभ्य माणूस आहे हे पण तुम्ही मान्य कराल. आज चुकून तुम्ही घरी राहिलात मला कल्पना नसताना. नाही तर मी आज कुठे तरी बाहेर राहिलो असतो. तुमची मोटर गेलेली पाहिली. वाटलं तुम्ही पण गेला असणार—

सविता : वा... बरंच निरीक्षण केलंय तुम्ही आमचं. क्वाइट इंट्रेस्टिंग!

माणूस : तर ते झालं. आता आपली ओळख झालेय. शिवाय कुंदा तुमची मैत्रीण. तेव्हा पुढे मतभेद असले तर आपण नंतर मिटवू. आता वाजले किती?

सविता : साडेपाच—

माणूस : किती?

सविता : साडेपाच! का?

माणूस : अरे बापरे! म्हणजे माझं मरणच. फक्त पंधरा मिनिटांत...

सविता : तुम्हाला ते पण कळतंय ?

माणूस : हो, निदान आजच्यापुरतं कळलंय.

सविता : मग इथं कशाला आलात ?

माणूस : चेष्टा करू नका हो. ही वेळ तशी नाही. मी खरंच महान संकटात उभा आहे. तुम्हांला कल्पना नाही येणार— मला वाचवा– एस. ओ. एस.

सविता : म्हणजे काय करू ?

माणूस : अहो, आता मला एक अपॉइंटमेंट आहे. पावणेसहाला.

सविता : मग जा तुम्ही.

माणूस : जा कुठं ? अपॉइंटमेंट इथं आहे.

सविता : इथं ? मग बसा— येणारा माणूस येईलच वेळेवर.

माणूस : अहो, तो माणूस नाही.

सविता : माणूस नाही ? अहो, काय बोलता काय ? तुम्ही सत्यवान वगैरे नाही ना ? मरण जवळ आलेलं— वेळ ठरलेली— भेटायला येणारा तो माणूस नाही— बोला.

माणूस : आता काय बोलू ? अहो, माणूस नाही म्हणजे तसा यम वगैरे नाही.

सविता : मग ? बोला लवकर.

माणूस : आता काय सांगणार ? माणूस नाही म्हंजे— म्हंजे ती बाई आहे.

सविता : काय ? बाई ? इथं असले पण धंदे करता तुम्ही ? आमचं घर म्हंजे वाटलं काय तुम्हाला ? धिस इज टू मच ! मी साफ सांगते. इथे कुणा बाईला वगैरे येऊ देणार नाही मी.

माणूस : पण माझं ऐकून तर घ्या.

सविता : ऐकून काय घ्या ? मला काय कुकुलं बाळ समजलात ?

माणूस : पण ही तशी नाही. विश्वास ठेवा माझ्यावर.

सविता : कसला विश्वास ठेवा ? एका ब्लॉकमध्ये तरुण पुरुषाला भेटायला येणारी बाई— आणि म्हणे तशी नाही— ती काय हवा–पाण्याच्या गप्पा मारायला येणार ? मी साफ सांगते.

माणूस : तुम्ही डोक्यात राख घालू नका. प्रत्येक क्षण मोलाचा आहे. तुम्ही अशा वागलात तर खरंच मला गळफास लावून घ्यावा लागेल. ऐका तुम्ही माझं. येणारी बाई म्हणजे तशी बाई नाही.

सविता : तुम्ही शुद्धीवर आहात ना ? मघाशी म्हणालात तो माणूस नाही. आता म्हणता ती बाई नाही.

माणूस : बाई नाही म्हणजे ती आपली एक मुलगी आहे. माझं प्रेम आहे तिच्यावर. नि तिचं माझ्यावर. तिला घरी फार त्रास होतो. आम्ही आज प्रथमच भेटणार आहोत इथं. असे एकटे. त्यातसुद्धा तुम्ही आलात. कल्पना नसताना. आता मला जरा मदत करा. मला आपला भाऊ माना, किंवा काहीही माना. नको, नको भाऊच माना. पण मला वाचवा.

सविता : अहो, रडू नका.

माणूस : रडत नाही मी. माझ्या भावनांचा उद्रेक आहे हा.

सविता : पण डोळ्यांत पाणी आहे तुमच्या— पुसा डोळे. असे रडत काय बसता बाईसारखे ? मी करीन तुम्हांला मदत.

माणूस : खरंच ?

सविता : अगदी खरं. नाही तरी तुम्ही कुंदाचे भाऊ. तुमच्याकरता एवढं केलंच पाहिजे मला. तुम्हाला कल्पना नाही पण कुंदाचं माझ्याशिवाय पान हालत नसे. एकदा काय झालं...

माणूस : एक्स्क्यूज मी, पण ती एवढ्यात येईल हो.

सविता : सॉरी हं. सांगा— मी काय करू ?

माणूस : तुम्ही— तुम्ही इथून निघून जा—

सविता : काय ?

माणूस : गैरसमज करून घेऊ नका. मी तुम्हाला तसं जायला नाही सांगत— पण तुम्हाला इथं पाहिलं की तिला भलताच संशय येईल. म्हणून तुम्हाला जा म्हटलं.

सविता : हा चांगला धंदा आहे— माझ्याच घरातून मलाच जायला सांगता ? मी मुळीच जाणार नाही.

माणूस : पण आत्ताच तुम्ही म्हणालात ना मदत करीन म्हणून ?

सविता : मग मदत करीन— म्हणून बाहेर नाही जाणार.

माणूस : अहो, मग कसं समजावू तिला ? माझं जगणं किंवा मरणं तिच्यावर अवलंबून आहे हो— आणि तुम्ही म्हणता जाणार नाही म्हणून...

सविता : मग मी नाहीच जाणार— मी गेले म्हणजे तुम्हाला रान मोकळं. दुसरं

काही सांगा करायला.

माणूस : दुसरं काय सांगणार ? कपाळ ? अं ? हो— नाही तर आपण असं करू या— तुम्ही माझी बहीण व्हा— नको, पण बहीग नको. ती म्हणेल अजून-पर्यंत कसं नाही बोललात !

सविता : अहो, चालेल. चुलत, चुलत, चुलत. किंवा मावस–चुलत बहीण म्हणून सांगा. आजच सकाळी आली.

माणूस : आयडिया, तुम्ही कुठं असता नेहमी ?

सविता : हे काय ? इथंच.

माणूस : च् च्. इथंच काय ? प्रश्न मी नाही विचारीत—

सविता : म्हंजे ?

माणूस : ती विचारतेय—

सविता : आँ ?

माणूस : असं काय करता— ती विचारतेय असं समजा. आयत्या वेळी घोटाळा होईल नाही तर.

सविता : हं हं— विचारा.

माणूस : " तुम्ही कुठं असता नेहमी ? "

सविता : इंदूरला.

माणूस : अय्या, इंदूरला ?— किती छान. माझी पण मावशी आहे तिकडे. काच महालासमोर रहाते. काय मस्त आहे इंदूर नाही ? मी गेलेय खूप वेळा. तुम्ही कुठं राहता इंदूरला ?

सविता : अय्या ! काय हो सांगू ? मला काहीच माहिती नाही इंदूरची. मी पाहिलं सुद्धा नाही इंदूर—

माणूस : माय गुडनेस, मग इंदूर कशाला म्हणालात ?

सविता : मग काय म्हणू ?

माणूस : दुसरं काही तरी म्हणा— सांगा कुकुपुरी म्हणून—

सविता : ते कुठे आहे ?

माणूस : सांगा केरळमध्ये म्हणून, म्हंजे ती जास्त विचारणार नाही. बरं, " मिस्टर काय करतात तुमचे ? "

सविता : आं ? आता काय सांगू ?

माणूस : सांगा बँकेत आहेत म्हणून. बँका सगळीकडेच असतात. तर ठरलं. बँकेत. क्विक " मुलं किती ? "

सविता : इश्श...

माणूस : इश्श काय ? मी नाही विचारीत. ती विचारील. बाई आहे ना ती ? बारीकसारीक सगळं विचारणार. " कुठल्या शाळेत जातात ? मराठी कसं शिकवतात ? " हजार प्रश्न विचारणार.

सविता : मूल नाहीच म्हणून सांगते—

माणूस : त्यावर काही विचारलं तर ?

सविता : त्यापेक्षा आपण लग्न झालंच नाही म्हणून सांगू—

माणूस : ( तिच्याकडे नीट पहात ) खपेल—

सविता : म्हंजे ?

माणूस : नाही तर मला विचारायची— का झालं नाही म्हणून ? तर हे ठरलं— लग्न झालेलं नाही. करायचा विचार आहे हं. ते मंगळसूत्र तेवढं काढून ठेवा बघू, नाही तर नेमकं तेच राह्यचं गळ्यात...

सविता : बापरे— मंगळसूत्र नाही हं काढणार मी—

माणूस : मग तुम्ही कुमारिका कशा ?

सविता : ते तुमचं तुम्ही पाहा.

माणूस : असं काय करता ?

सविता : नाही तर आपण दुसरं काही तरी ठरवू या.

माणूस : पण एवढा वेळ नाही— असं करू नका हो. मी पाया पडतो तुमच्या. अं ! नाही तर असं करू या का ? तुम्ही काकू व्हा माझ्या.

सविता : काकू ?

माणूस : हो, काकू— काकाची बायको. फार तर लांबच्या काकाची, काय ?

सविता : चालेल—

माणूस : हो— पण नको. काकू नको.

सविता : का हो ?

माणूस : नको— एवढी तरुण आणि चांगली काकू बघून तिला भलताच संशय यायचा. शिवाय मी तिला सांगितलंय मी एकटाच आहे म्हणून. मला कोणी जवळचा नातेवाईक नाही म्हणून.

सविता : मग असं करू या का ?

माणूस : काय ?

सविता : मी बेडरूममध्ये झोपून जाते. तुम्ही बंद करून घ्या बेडरूम.

माणूस : नि तिनं विचारलं तर ?

सविता : सांगा किल्ली हरवली म्हणून.

माणूस : ती विश्वास नाही ठेवणार— आधीच बाई— त्यातून लग्न व्हायचंय. मग नक्कीच हट्ट धरणार मला बेडरूम बघायचीय म्हणून. म्हंजे मी खलास. तुम्हाला कल्पना नाही यायची बायकांचा हट्ट म्हंजे काय याची. खुद्द (वर परमेश्वराला उद्देशून) भाऊसाहेबांनासुद्धा पत्ता लागलेला नाही.

सविता : मग मी काय करू ते सांगा.

माणूस : मी तरी काय सांगू ? जरा शेजारी वगैरे बसा. नाही तर पिक्चरला वगैरे जा.

सविता : एकटी ? मी नाही जाणार.

माणूस : मग आता तुमचं डोकं चालवा. प्रत्येक क्षण महत्त्वाचा आहे. ती आत्ता येईल. हां— आयडिया. तुम्ही एक करा.

सविता : काय ?

माणूस : तुम्ही मोलकरीण व्हा.

सविता : मोलकरीण ?

माणूस : म्हंजे टेंपररी हो. नाटकात काम करतात तसं. मागं महिला मंडळात एका मंत्र्याच्या बायकोनंसुद्धा मोलकरणीचं काम केलं होतं— तिला पहिलं बक्षीस मिळालं. तसं. दोन एक तासांचा प्रश्न आहे. नाही म्हणू नका.

सविता : पण मोलकरीण म्हंजे...

माणूस : मला कल्पना आहे. तुम्हाला त्रास होईल याचा. पण जरा थ्रिल पण आहेच. तेव्हा प्लीज, वेळ घालवू नका. जरा साडी वगैरे बदला.

सविता : साडी बदलू ?

माणूस : हो, मग या साडीत तुम्हाला मोलकरीण कोण म्हणेल ? जरा जुनी साडी नेसा. केस वगैरे उडवा. काही तरी करा. मोलकरीण दिसाल असं करा. आणि ती आल्यावर थोड्या वेळानं आतून, 'साहेब, भांडी झाली. आणखी काही करायचंय् ?' असं विचारा— चला लवकर. विश यू बेस्ट ऑफ लक.

(ती जाते. पाच— सहा साड्या घेऊन येते.)

सविता : यातली कुठली नेसू?

माणूस : कुठलीही नेसा हो.

सविता : नाही तर नऊवारी नेसू का? आहे माझ्याकडे एक. कॉलेजमध्ये नाटकात काम करताना नेसले होते. चालेल?

माणूस : बेस्ट. पण लवकर. पाणी गळ्याशी आलंय.

सविता : अहो, जरा त्या उशीच्या खाली माझी खणाची चोळी आहे का बघता?

माणूस : ऑं?

सविता : नाही— नाही. आतच आहे. घाई आहे म्हणून तुम्हाला सांगितलं.

[ती आत जाते.]

[तो मुलीची वाट पाहात उभा. तिला कशी रिसिव्ह करावी याची तालीम करतो. 'अं हं– असं नाही– असं' वगैरे. एवढ्यात बेल वाजते. कपडे सारखे करीत तो दार उघडतो. नि म्हणतो 'या...' दारात १२–१३ वर्षांचा मळकट कपडे घातलेला मुलगा उभा.]

मुलगा : सदा सर्वदा योग तुझा घडावा—

माणूस : ऑं? हे काय? काय रे? तू काय करतोस इथं?

मुलगा : गरीब विद्यार्थी आहे साहेब. घरी चार भावंडं आहेत. आई बिछान्यावर असून काही करू शकत नाही. वडिलांची दृष्टी अधू असून त्यांची पण नोकरी गेलेली आहे. आपण काही मदत कराल तर पुढचं शिक्षण घेणं शक्य आहे.

माणूस : ही काय वेळ आहे मदत मागायची?

मुलगा : पाच वाजेपर्यंत शाळा असते साहेब.

माणूस : शिवाय घरच्यासारखा बेल वाजवतोस?

मुलगा : नाही तर तुम्हाला कसं कळणार मी आल्याचं साहेब?

माणूस : अरे वा. बराच हुशार दिसतोस हं. मदतबिदत काही नाही. जाव— (पोरगा हालत नाही.) अरे, जा म्हणतो ना. (पोरगा तिथंच) वेरक्या दिसतोस.

मुलगा : तशी मदत करणं शक्य नसेल तर उदबत्ती विकत घ्या साहेब. मी स्वतः बनवतो साहेब. बनवाबनवी नाही–ही कस्तुरी–ही चंदन. ही गुलाब. अहाहा!

काय मस्त वास आहे. लावून बघा. वहिनीसाहेब खूष होतील.

माणूस : इथं वहिनी वगैरे कोणी नाही.

मुलगा : होणाऱ्या वहिनीसाहेब खूष होतील.

माणूस : आगाऊच आहेस. मला उदबत्ती नको.

मुलगा : असं करू नका साहेब. मराठी माणसांनीच असं केलं तर आमचं कसं होणार ?

माणूस : हे मला काय विचारतोस ? मला एकच गोष्ट माहीत आहे, मला आता उदबत्ती नको.

मुलगा : असं काय करता साहेब–? आपण मराठी माणसांनी मराठी माणसाला मदत केली नाही तर सगळ्या महाराष्ट्राचं काय होईल ? साहेब...

माणूस : वैतागच आहे— ए मराठी माणसा, मलाच आता मदतीची गरज आहे.

मुलगा : तुम्हांला ? काय मदत करू बोला— (आत येतो.)

माणूस : (गोंधळलेला) काही नाही– काही नाही— पण तू बराच मराठी दिसतोस हं—

मुलगा : मग मदत करा साहेब. ही कस्तुरी, ही चंदन.

माणूस : किती पैसे ?

मुलगा : फक्त दोन रुपये साहेब.

माणूस : हे घे. (दोन रुपये देतो.) चल आता.

मुलगा : आभारी आहे साहेब— जय महाराष्ट्र ! (जातो.)

[ माणूस दार बंद करतो. मागं वळतो. सविता उभी— मोलकरणीच्या वेषात. ]

सविता : कशी दिसते मी ?

माणूस : छान. एवढ्या चांगल्या नसता दिसलात तरी चाललं असतं.

सविता : वाटलं नऊवारी नेसायला जमतंय की नाही.

माणूस : छान जमलंय, आता तुम्ही आतच थांबा. नि ती आली की जरा वेळानं आतून म्हणा, ' साहेब, भांडी झाली— दुसरं काही करायचं ? ' असं काही तरी. क्लिक.

सविता : खरं सांगू ? मला पण खूप मजेशीर वाटतंय.

[ एवढ्यात परत बेल वाजते. सविता आत पळते. ]

माणूस : आयला काय कटकट आहे. चक्क बेल वाजवून भीक मागतात. (दार उघडतो.) मला आणखी उदबत्ती नको. दुसऱ्या मराठी माणसाकडे जा—

[ दारात एक मुलगी उभी. ]

मुलगी : अहो...

माणूस : सांगितलं ना तुला— मला आणखी उदबत्ती नको—( मुलीकडे पाहून ) ऑं! तू!— सॉरी हं— मला वाटलं की तो उदबत्तीवालाच उभा आहे. ये ना— ये अशी— बैस—

मुलगी : काय सुंदर ब्लॉक आहे हो तुमचा.

सज्जन : मग ? तुला काय वाटलं ?

मुलगी : खरंच सुंदर. अगदी माझ्या मनात होता ना तस्साच. असं वाटतं, असं वाटतं की, मी इथं कधी तरी आले होते. हा दरवाजा, ही खिडकी, हे पडदे सगळं कसं ओळखीचं वाटतंय. मी ही अशी उभी होते. हातात सुगंधी पुष्पमाला घेऊन. आणि तो आला. तो आला पांढऱ्या शुभ्र घोड्यावरून, फेसाळ लाटेची आयाळ पकडून चांदण्या उधळत. मी मोहरून, बहरून गेले पारिजातकासारखी. झिमझिमत्या हिमात थुईथुई उडणारं कारंजं झालं शरीराचं. तो म्हणाला, 'काय वाटतंय ?' मी म्हटलं, वाटतंय, वाटतंय की, इथून हलूच नये.

सज्जन : अग, मग तुला कोण सांगतंय हलायला ? तू इथंच रहा. अशीच. एक-वेळ सूर्य-चंद्र हलतील—

मुलगी : पुरे पुरे— आई-बाबांना कळलं ना, तर सूर्याची पिल्लंच दिसतील. पण खरंच किती सुंदर लावलाय हो ब्लॉक— एखाद्या बाईनं लावावा तसा—

सज्जन : बाईनंच लावलाय—

मुलगी : म्हंजे ?

सज्जन : ( गांगरलेला. ) म्हंजे— म्हंजे आपण आपलं तसं समजायचं—

मुलगी : बघू का मी आत जाऊन ?

सज्जन : हो, बघ की— तुला कसली बंदी ! ( ती आत जाते— झटकन बाहेर येत. )

मुलगी : अहो, आत कुणी तरी बाई आहे—

सज्जन : बाई ? हां हां– ती ना ? ती बाई नाही—ती मोलकरीण आहे. सांगायचं विसरलोच मी— म्हटलं तू येणार तर चहा वगैरे पण कर– तुला त्रास नको— काय ?

मुलगी : ही मोलकरीण ?

सज्जन : हो— चांगली आहे—

मुलगी : हे बघा– मी इथं यावंसं वाटत असेल तर ही नको इथं—

सज्जन : का ग ? म्हटलं ना चांगली आहे म्हणून—

मुलगी : म्हणूनच– फार चांगली आहे म्हणून. इथं मालकीण कोण हा प्रश्न पडायचा— आणि काय हो, तुम्ही कधी बोलला नाही ते ? किती दिवस आहे इथं कामाला ?

सज्जन : भलतीच संशयी बाई तू– अग, किती दिवस कुठची— आजच आली प्रथम. अजूनपर्यंत कधी पाहिलीसुद्धा नव्हती— तो माझा मित्र आहे ना फडके ? तो आपल्याला समुद्रावर भेटला होता– माझ्या पाठीवर जोरात थाप मारली- आपण बसलो होतो काळोखात, आठवतं ?

मुलगी : हो... न आठवायला काय झालं !

सज्जन : फडके म्हणतोय मी.

मुलगी : हो तोच. चांगला आठवतोय.

सज्जन : तर त्यानं पाठविलं हिला. हिची आई म्हणे त्यांच्याकडे काम करते गेली पंधरा वीस वर्षं— म्हणाला, चांगली आहे. विश्वासू आहे. अगदी स्वतःच्या घरात असल्यासारखं करील.

मुलगी : अस्सं होय ?

सज्जन : नाही– तस्संच नाही. पण बघ तू. तुला वाईट वाटली तर नंतर काढून टाक. काय ? (एवढ्यात आतून आवाज— 'साहेब, भांडी झाली. आणखी काय करायचंय ?')

मुलगी : शुद्ध बोलते की.

सज्जन : चांगल्या घरची आहे. म्हंजे मी नीट विचारलं नाही अजून. आत्ताच आली पंधरा मिनिटांपूर्वी. तो फडके आपला म्हणाला होता.. ! 'हे बघ, चहा झाला असला तर घेऊन ये. आणि बिस्किटं किंवा दुसरं काही असलं तर घेऊन ये खायला.'

मुलगी : अहो, तिला कसं कळणार ? आणि खायला काय असणार इथं ? इथं कोण करतं ?

सज्जन : करणार कोण ? भलतीच संशयी तू. कोणी तरी पाठवतं कधी. नाही तर विकत आणतो. देतो ठेवून. तुझ्यासारखं कोणी आलं तर उपयोगी पडतं.

मुलगी : बरेच व्यवहारी आहात की.

सज्जन : मग ?

[ एवढ्यात सविता चहा घेऊन येते. टेबलावर ठेवते. ती परत फिरणार एवढ्यात— ]

मुलगी : नाव काय ग तुझं ?

सविता : माझं होय ? सविता.

मुलगी : एकदम मॉडर्न नाव आहे, तुझ्यासारखंच. नवरा काय करतो ग तुझा ?

( सविता सज्जनाकडे बघते. तो पण गोंधळतो. )

सज्जन : अग, गांगरतेस काय ? ही मालकीण होणारेय इथली. सांग, कुठं गिरणीत वगैरे आहे ना कामाला ? तो फडके कायसं म्हणत होता. विसरून गेलो.

सविता : होय– गिरणीत आहेत.

मुलगी : अरे वा ... मग तू कशाला असली कामं करतेस ? किती पगार मिळतो त्याला ?

सज्जन : अग, तिला काय विचारतेस ? तिला काय माहीत असणार ? शिवाय नवरे आपला खरा पगार सांगतात काय ? सांगितलाच तर पन्नास वाढवून सांगतात. काय ग, खरं की नाही ? ( ती बोलत नाही. )

मुलगी : घरी कोण कोण आहेत ग ?

सविता : एक सासू–एक नणंद–एक दीर.

मुलगी : दीर काय करतो ?

सविता : शाळेत शिकतो.

मुलगी : वय काय तुझं ?

सविता : असेल पंचवीस.

मुलगी : लग्नाला किती वर्षं झाली ?

सविता : तीन—

मुलगी : मुलं किती आहेत ?

सविता : इश्श ! ( ती लाजून तोंड फिरवते. )

सज्जन : तू पण काय विचारतेस ? तीन वर्षांत किती मुलं असणार ?

मुलगी : पण ती लाजली बघ काय मस्त– ( सविता जाते. )

सज्जन : उद्या तू पण अशीच लाजशील– ( जवळ जातो. )

मुलगी : चल चावट कुठला— ( हे चालू असताना सदानंद दार उघडतो. आतला प्रकार पाहून चक्करतो आणि म्हणतो– )

सदानंद : सॉरी हं. मला वाटलं मी माझ्या घरात आलोय. ( झटकन बाहेर जातो— दरवाजा बंद करतो– )

प ड दा

# अंक दुसरा

[ पहिला अंक संपला तिथंच दुसरा सुरू ]

मुलगी : कमाल आहे तुझी.

सज्जन : कमाल कसली ?

मुलगी : मोलकरणीच्या देखत काय म्हणतोस, तू पण तशीच लाजशील म्हणून

सज्जन : त्याला काय झालं ?

मुलगी : म्हणे त्याला काय झालं ? शिवाय तो कोण तो नेमका कडमडला त्याच वेळी.

सज्जन : त्याला शिव्या देऊ नको. तुला रिसिव्ह करायच्या गडबडीत मी दार बंद करायला विसरलो असणार. तो चुकून शिरला असेल– तंद्रीत.

मुलगी : हो. पण किती ऑकवर्ड. परत नको हं चावटपणा– मला आपला ब्लॉक दाखवा पाहू.

सज्जन : ओ, येस. चल बघच कसा तयार ठेवलाय. म्हणजे तुला त्रास नको. संसारी माणसासारखा सजवलाय. चल––

[ ती आत जायला निघतात– तेवढ्यात बेल वाजते. ]

सज्जन : तू चल आत– मी बघतो कोण आहे ते.

[ दार उघडतो. दारात एक म्हातारा उभा – खादी वेषधारी. ]

म्हातारा : एस. एम. झुंजार ?

सज्जन : एस. एम. झुंजार ? अं...हां, हो, मीच. का ? या, या !

म्हातारा : म्हणजे ही जागा तुमचीच ?

सज्जन : अर्थात ! शंका का आली तुम्हाला ?

म्हातारा : शंका नाही– खात्री करून घेतली. ते बरं असतं.

सज्जन : बरोबर आहे.

म्हातारा : तुमच्या इमारतीत शिरायचा दरवाजा पश्चिमेला आहे.

सज्जन : असेल.

म्हातारा : आहे. अनिश्चित विधानं करायची आम्हाला सवय नाही. बोलायचं ते ठाम. कृती करायची ती न भिता. मग काहीही होवो. एकदा दिशा कळल्यावर माघार नाही. कितीही संकटं येवोत, संकटाचे काटेकुटे...

सज्जन : ...पार केल्याशिवाय यशाचं मंदिर दिसणार नाही. आमच्या इमारतीत शिरायचा दरवाजा पश्चिमेलाच आहे. कारण त्या बाजूला सूर्य मावळतो. तर त्याचं काय आहे..

म्हातारा : हे आपल्याला आवडलं— एकदम.

सज्जन : काय ?

म्हातारा : तुमचं बोलणं— एकदम मुद्द्याशी गाठ. फालतू चर्चा नको. आम्हाला अशी माणसं आवडतात. बसू का ?

सज्जन : अं.. हो हो बसा...

म्हातारा : आमचा एक दोस्त होता. म्हणजे आहे. तो याच्या उलट. आम्ही बडोद्याला असताना तात्यांना आणायचं ठरलं व्याख्यानासाठी. तात्या म्हणजे आपले सावरकर. तर त्याच्याजवळ पैसे दिले आणि म्हटलं, जा मुंबईला. जाऊन आला. म्हटलं, काय झालं, तर म्हणतो, 'इथून निघालो तो १०। वाजले होते. म्हंजे गाडी सुटायला दीड तास होता. म्हटलं घरी जाऊन येऊन निघावं. निघालो. घरी गेलो तो सासरे आलेले.' त्याला म्हटलं, 'ते कळलं रे बाबा, तू स्टेशनवर गेलास. पुढं सांग' 'हां, तर स्टेशनवर गेलो— तिथं ही गर्दी. म्हटलं तिकीट कसं मिळणार ?' म्हटलं, 'तिकीट मिळालं. पुढं सांग.' त्याचं वर्णन आपलं संपेना. शेवटी म्हटलं, 'मुद्द्याचं बोल. तू मुंबईला पोचलास. तात्यांच्या घरी गेलास. ते भेटले. पुढे बोल.' तर म्हणतो, 'ते भेटले नाहीत. ते कलकत्याला गेले होते.' तर अशी गंमत ! म्हणजे महत्त्वाचा जो मुद्दा तो सोडायचा. तर मी काय म्हणत होतो ?

सज्जन : आमचा दरवाजा...

म्हातारा : बरोबर. हां, तर तुमच्या इमारतीत शिरायचा दरवाजा पश्चिमेला आहे. त्याच बाजूला आमचा क्लब आहे. मी ब्रिज खेळायला तिथं येतो रोज.

सज्जन : तुम्ही ब्रिज खेळता ?

म्हातारा : हो— हो. खेळ कोणताही वाईट नाही, ज्यामुळं आपलं मन...

सज्जन : आमच्या दरवाज्याचं काय ?

म्हातारा : तेच सांगतोय. चहा पिण्यापूर्वी चूळ भरावी– काही शंका ?

सज्जन : नाही— काही नाही—

म्हातारा : ठीक— चहा पिण्यापूर्वी चूळ भरावी म्हणून बाहेर आलो. ही आपली सवय— की आधी चूळ भरायची—

सज्जन : त्याबद्दल काही म्हणणं नाही माझं—

म्हातारा : तर बाहेर आलो नि तुमच्या इमारतीकडे लक्ष गेलं.

सज्जन : का थांबलात ?

म्हातारा : तेव्हा एक तरुण मुलगी इथं जिना चढून येताना दिसली.

सज्जन : असं का ?

म्हातारा : ती माझी धाकटी मुलगी. क्रमांक चार. आज सकाळपासून आपल्याला संध्याकाळी मैत्रिणीकडे जायचंय असं सांगत होती. पुन्हा पुन्हा बजावून. मैत्रिणीचं नाव आरती गांगुली असं म्हणाली. तर इथं कुणी आरती गांगुली राहाते काय ?

सज्जन : नाही बुवा ! इथं मी एकटाच राहातो.

म्हातारा : ठीक. म्हंजे तिला मी इथं येताना पाहिलं. पहिल्या मजल्यावर. इमारतीला दुसरा मजला नाही. या मजल्यावरचा पलीकडचा ब्लॉक बंद आहे. तेव्हा ती इथंच आली असली पाहिजे.

सज्जन : नाही बुवा, इथं मुलगी वगैरे कुणी नाही.

म्हातारा : खोटं बोलू नका. मी शांतपणे बोलतोय याचा अर्थ मी मूर्ख आहे असा नाही. कधीही कोणत्याही प्रसंगात तोल सुटू द्यायचा नाही. भडकायचं नाही. हे आम्ही शिकलो सविनय कायदेभंगात. कायदा मोडायचा तो सुद्धा आक्रस्ताळेपणे नव्हे. शांतपणे. आपली बाजू सत्य असली म्हणजे घसा फोडायची किंवा काहीच फोडायची जरुरी नाही, असं बापूजी नेहमी म्हणत असत. बापूजी म्हणजे आमचे वडील. कॉलेजात आम्ही तर्कशास्त्र शिकवलं तेव्हा असंच शिकवलं. तर्कशास्त्र म्हणजे तारेवरची कसरत. नीट तोल सांभाळला तर ठीक— हो, पण तो मुद्दा नाही.

सज्जन : नाही कसा ? तो पण चांगला मुद्दा आहे.
म्हातारा : असेल. पण इथं नाही. इथं माझी मुलगी.
सज्जन : पण मी म्हटलं ना. इथं मुलगी बिलगी कुणी नाही म्हणून.
म्हातारा : तुम्ही म्हणालात. ठीक. आता मी घरात पाहू शकतो का ?
सज्जन : म्हंजे ही कमालच. माझ्या घराची तपासणी करता ? काय म्हणून ? मी काय पोरी पळवणारा वाटतो तुम्हाला ?
म्हातारा : मुलींना पळवायची जरुरी नसते. त्या चालतात.
सज्जन : अरे वा...शांतपणे बोलत बोलत बरेच खोल चाललात की. तुम्हाला असला काही संशय असेल तर पोलिसला बोलवा. तुम्ही कोण म्हणून तपासणी करणार ?
म्हातारा : तुमचं बरोबर आहे. मला तुमचं घर तपासायचा अधिकार नाही. पण माझ्या मुलीचा शोध करायचा अधिकार आहे. तेव्हा तुम्ही म्हणता त्याप्रमाणे मी पोलिसांना कळवतो. जरा हा फोन वापरू का ?
सज्जन : ही आणखीनच कमाल. म्हंजे तुम्ही माझ्याविरुद्ध तक्रार करणार. आणि ती माझ्याच फोनवरून ? जमणार नाही. तुम्ही दुसऱ्या कुठून तरी फोन करा. नाही तर काय वाटेल ते करा. पाहिजे तर इथे पहारा देत बसा.
म्हातारा : ठीक आहे. मी तुमच्यावर बळजबरी करू शकत नाही. खालच्या इराण्याकडून फोन करतो. ( जातो. )
सज्जन : ( जोरात हाक मारतो. ) मधू– ए... मधु–
मधू : काय हो... ? काय झालं ?
सज्जन : मी मेलो— पाणी आणा.
मधू : अहो, असं काय करता ? छातीत कळ आली का ?
सज्जन : सबंध अंगात कळ आली. आता तुझं पण मरण मधू माझ्याबरोबरच.
मधू : पण झालं काय ? नुसतं मरण मरण काय करता ?
[ सविता पाणी आणून देते. ]
सविता : डॉक्टरला आणायचं का ?
सज्जन : नको, ते दार उघडू नको. तिथंच यम आहे.
मधू : अहो, काय झालंय तुम्हाला ? नीट बोला ना.
सज्जन : नीट बोलायचा प्रयत्न करतोय. पण जीभ वळत नाही. मधू, आता

काय करायचं ? कशाला मी बोलावलं तुला इथं ?

सविता : अहो, पण झालं काय ते सांगा.

मधू : तेच ना. उगीच दुसऱ्याचा जीव टांगणीवर.

सज्जन : अग ... तुझे वडील— ते बघ.

मधू : आँ... ? कुठं आहेत ? मला नाही दिसत ?

सज्जन : आले होते इथं आत्ता. आता खाली गेलेत. पोलिसला फोन करायला इराण्याकडे.

मधू : का ?

सज्जन : का काय ? मी म्हटलं तू इथं नाहीस म्हणून, आणि त्यांनी तुला येताना पाहिलंय.

मधू : आश्चर्य आहे. पण मी घरी सांगितलं होतं, मी आरतीकडे जातेय म्हणून.

सज्जन : पण मी आरती नाही ना ?

मधू : अग आई ग ... आता कसं करायचं ?

सज्जन : आता आणखी आईला नको हाक मारू.

मधू : आता काय करायचं रे ? तू तरी सांग काही तरी.

सविता : असं करू या का ? मी सांगते मीच आरती म्हणून.

मधू : नको— त्यांनी पाहिलेलं आहे आरतीला.

सज्जन : आणि मी पण सांगितलंय इथं आरती वगैरे कुणी नाही म्हणून; शिवाय पोलिसचं लफडं ...

सविता : मग आता तुम्ही एकच करा. ताबडतोब इथून पळा. मी पाहीन पुढं.

सज्जन : आणि त्यांनी पाहिलं तर ? इराण्याकडनं बरोबर दिसतो एंट्रन्स.

सविता : पण प्रयत्न करून बघा.

मधू : चल ना. वेळ नको घालवू नुसत्या शंका काढीत. लेट अस टेक अ चान्स ! मला इथून गेलंच पाहिजे रे. ( जातात तसे मागे येतात. ]

सविता : काय हो, काय झालं ?

सज्जन : मला विष द्या– नाही तर गोळी घाला–

सविता : अहो, पण झालं काय ?

सज्जन : म्हातारा जिन्यावरच आहे. बहुधा जायचं की नाही या विचारात.

सविता : मग आता ?

सज्जन : आता काय ? काही नाही— फाशीची तयारी. बोला, कुणाला काही सुचतंय का ? जय हनुमानजीकी. तूच वाचव—

सविता : थांबा, मला एक सुचतंय. करू या का ?

मधू : करू या का काय ? बोल लवकर. काय वाटेल ते सांग.

सविता : तुम्ही सांगा मीच एस्. एम्. झुंजार म्हणून—

सज्जन : तसंच सांगितलं.

मधू : झुंजार कोण ?

सज्जन : माझा बाप— आता मधे मधे प्रश्न विचारू नकोस. होता इथं एक जुना भाडेकरू. त्याचाच बोर्ड आहे बाहेर.

मधू : मग ते हिला कसं माहिती ?

सज्जन : माझे आई– पाया पडतो. शंका काढू नको आता. यम दार ठोठावीत असताना– हं, बोला तुम्ही—

सविता : हं– तर तुम्ही सांगा 'मीच झुंजार म्हणून'– नि मी होते सौ. झुंजार. थोड्या वेळापुरती– म्हंजे तुम्ही सज्जन आहात हे त्यांना पटेल नि तुम्ही बसा स्वैंपाकघरात. डोक्यावर पदर घेऊन. ते गेले की मग बघू.

सज्जन : आयडिआ– बघू या प्रयत्न करून. म्हातारा फार खट दिसतोय. पण (एवढ्यात बेल वाजते.) मधू, तू पळ आत लवकर. तुम्ही पण— (जातात) (सज्जन दार उघडतो. दारात पुन्हा म्हातारा.)

सज्जन : केलात फोन ?

म्हातारा : नाही.

सज्जन : नाही ? का ?

म्हातारा : बेत बदलला मी.

सज्जन : अरे वा... !

म्हातारा : त्याचं असं आहे, तुमची दुसरी सूचना पटली मला— तुम्ही म्हणालात पाहिजे तर इथं पहारा देत बसा. म्हटलं मला वेळ आहे. शिवाय ती कुठंही असली तरी आठच्या आत तिला घरी गेलंच पाहिजे. तिच्या आईची शिस्त. आमची हिंमत नाही उशिरा जायची, तर तिचं काय ? तेव्हा ती इथं असेल तर बाहेर येईलच. पाहावं— म्हंजे पोलिस वगैरे लफडं नको. आपलेच

जात आपलेच ओठ. उगीच तमाशा कशाला ? काय ? ब्लॉक सिस्टीमचा हा एक फायदा आहे. एकच दरवाजा. लक्ष ठेवायला बरं. काय ?

सज्जन : पण तुम्ही हे भलतंच काय लावलंय ? लक्ष कसलं ठेवा ? मी काय कुणी चोर आहे ?

म्हातारा : मी तुमच्यावर अजून आरोप केलेला नाही.

सज्जन : पण संशय आलाय ना ? तेच ते. तुम्हांला काय सांगू आता ? अहो, खरंच तुमची मुलगी इथं नाही--- मी चांगला संसारी माणूस आहे.

म्हातारा : मघा म्हणालात मी एकटा आहे.

सज्जन : अहो, एकटा म्हंजे काय ? मी आणि माझी बायको.

म्हातारा : बायको ? इथं आहे ?

सज्जन : हो, का ? खोटं वाटतं ? तिला बोलावतोच बाहेर. ए– ए– जरा बाहेर ये बघू आपल्याकडे कुणी तरी आलेत– [ सविता बाहेर येते. ]

सविता : काय हो ? केवढ्यानं ओरडता ?

सज्जन : ये--- पाहिलंत ? ही माझी बायको–

म्हातारा : चला एक बरं वाटलं–

सज्जन : होय ना ! झालं ना समाधान तुमचं ?

म्हातारा : हो– बरं वाटलं, तुम्ही अजून फार पुढं गेला नाहीत, नाही तर नवरा बायकोला पपी म्हणायचा नि बायको नवऱ्याला गंपू किंवा असंच काही तरी. म्हंजे नवीन माणसाला नातं कळणं कठीण— काय ?

सविता : आपलं नाव ?

म्हातारा : माझ्या नावाशी आपला तसा काही संबंध नाही. समजा– आपलं गणपती– शंकर–

सज्जन : अग. यांना संशय होता, यांची मुलगी इथं आलीय म्हणून.

म्हातारा : संशय होता नव्हे– आहे.

सज्जन : ऑ ? मला वाटलं आम्ही सज्जन दिसल्यावर तुम्हाला खात्री पटेल.

सविता : अय्या ! पण इथं कशाला येईल यांची मुलगी ? नि आपण काय लपवून ठेवू की काय स्वयंपाकघरात ?

सज्जन : तेच ना—

सविता : नि वय काय मुलीचं ?

म्हातारा : वीस वर्षे, चार महिने, सोळा दिवस–

सविता : बापरे– मला वाटलं की, तीन-चार वर्षांची आहे की काय ?

सज्जन : अग बैस ना तू— उभी का ? ( ती त्याच्या शेजारी कोचावर बसते. नवरा बायको वाटावी अशी. एवढ्यात सदानंद दरवाजा उघडून डोकावतो. हे भलतंच दृश्य बघून ' ऑं ' एवढेच म्हणून दरवाजा ओढून निघून जातो. )

सविता : कोण होतं हो ?

सज्जन : दिसला नाही— नुसतंच ' ऑं ' करून गेला—

सविता : अहो, म्हंजे हे— ह नव्हते ना ?

म्हातारा : हे ? हे म्हंजे कोण ?

सज्जन : म्हंजे आपले चोरबीर हो— चोरांची हिला फार भीती वाटते हो– नसत्या हकिगती वाचतात पेपरात— मग असं होतं. जरा भास झाला की वाटतं चोरच—

म्हातारा : मग हरकत नाही.

सज्जन : आता तरी झाली ना तुमची खात्री— इथं कुणी दुसरी बाई नाही म्हणून ?

म्हातारा : अगदी खात्री म्हणू शकत नाही मी– पण सकृत्‌दर्शनी विश्वास ठेवण्यास हरकत नाही अशी परिस्थिती आहे खरी—

सज्जन : ( खूष होऊन ) आहे ना ? अग, चहा कर बघू दोन कप—जाण्यापूर्वी त्यांना चहा घेऊन जाऊ दे. नाही तर पुन्हा कशाला येतायत आपल्याकडे ?
[ सविता त्याला " कशाला चहाची भानगड ? जाऊ दे म्हाताऱ्याला अशी खूण करते—एवढ्यात बेल वाजते. ]

सज्जन : आयला, आता कोण बाबा आणखी ? असा वैताग देतात.
[ दार उघडतो — दारात एक पारशी उभा— सदानंदाचा बॉस. ]

सविता : कोण पाहिजे आपल्याला ?

बॉस : गुड इव्हिनिंग टू यू— ते एस्. एम्. झुंजार कुठे रहाते ?

सविता : इथंच— या ना आत—

बॉस : ( आत येत ) आत येयाला मला टाईम नाय. आय ॲम अ बिझी बॉडी— पुन ते घेलसप्पा ते कुठं गेला ?

म्हातारा : हे काय ? तुमच्यासमोर तर आहेत—

सविता : नाही— ते जरा बाहेर गेलेत— काही काम होतं का?

[ म्हातारा अपसेट. सज्जन त्याला समजाविण्याचा प्रयत्न करतो. ]

बॉस : साला बाहेर गेला? कमाल करते— मीनी तेला फोन केला तर काय ॲरोगंट जवाब देते— साला टिकीटच पुसला तर खबर नाय बोलते— बोलते के घेरची मॅतर घरामंदी ने ओफिसची मॅतर ओफीसमंदी. साला ओफिसचा टेलिफोन घरामंदी वापरटे. व्हाट डझ ही थिंक्स ऑफ हिमसेल्फ. मंडेला ओफिसमंदी चेअरमनला जबाब काय देल मी? तेला नाय पुसेल— मला पुसेल-- ही हॅज पुट मी इन व्हेरी ऑक्वर्ड पोझिशन. येल क्वा ते?

सविता : काही नक्की सांगितलं नाही त्यांनी—

बॉस : म्हंजे तुमालाबी सांगते नाय? बायडीलाबी नाय सांगटे? बेतर हाफलाबी नाय सांगटे? मोस्ट ईरॅस्पॉन्सिबली बिहेव करते. माजा हॉलीडे मोफत गेला. मीनी त्याला केवडा मदत केला— तो मलाबी असी आवाज देते. यू नो आय कुड हॅव, स्पॉईल्ट हिज कॉनफिडेन्शल रेकॉर्ड, पन नाय केला. बोलला जाऊनडे— फरगीव्ह केला. बोलला मार गोली.

सविता : पण बसा ना तुम्ही— चहाकॉफी वगैरे घ्या—

बॉस : (बसत) बसायला मला टाईम नाय. चाय बाय नको पायजे आमेला. तुम्ही तेंची मिसेस्?

सविता : हो.

बॉस : असी कसी करते टुजी हजबंड? बॉस संगट असी बेमानी टर बायडी संगट कसी? यू बेटर टेल हिम के टेचा कॉनफिडेन्शल रेकॉर्ड एक टाइम खराब जाला के मामला खलास.

सविता : कॉनफिडेन्शल रेकॉर्ड म्हंजे काय हो?

म्हातारा : मी सांगतो— कॉनफिडेन्शल रेकॉर्ड म्हणजे एका व्यक्तीचे दुसऱ्या व्यक्तीबद्दल मत. साहेबानं फायलीत लिहिलं म्हणजे ते कॉनफिडेन्शल.

बॉस : तुमी तेचा फादर काय? गुड ईव्हनिंग टू यू. टू टुजी पोऱ्याला सांग टू मच ईरॅस्पॉनसीब्ली बिहेव करते. साला एक्सप्लेनेशन पसेल तो जबाब काय देल. टेची बोलटी बंद होऊन जायेल. तुमी त्येला वॉर्निंग द्या— चांगला सोलिड फायरिंग दे.

म्हातारा : माझा मुलगा नाही तो.

बॉस : अरी — टुजी मुलगा नाय-- टर काय मा ऽ ऽ ऽ जाऊंडे. मार गोली. ऑल द सेम फायर हिम ! मीनी टेला प्रोमोसन दिला ने ओफिसर केला— साला ऑफिसर झाला म्हंजी काय मिनिस्टर झाला ? आपुनची बिलाडी आपुनची संगट म्याऊ ऽ ऽ

सविता : त्याचं काय आहे की त्यांना वाटलं की फोनवर कुणी दोस्तच बोलतोय.

बॉस : असी कसी वाटला ? दोस्ताच्या व्हाईस अने बॉस व्हाईस रेकगनाईज नाय करते ?

सज्जन : हिज मास्टर्स व्हाईस.

सविता : जरा गडबडीत होते. त्यांची बहीण जरा आजारी आहे.

बॉस : सिस्टर जरा सिक हाय— ते मला काय नाय इन्फोर्म केला ?

सविता : नाही— डॉक्टर म्हणाले की घाबरण्यासारखं काही नाही म्हणून.

बॉस : टे डॉकरला काय कळते कप्पाळ ? साला मानस हाय तो सिकनेस हायच. सिकनेस हाय तवा खोदायजीची याद येटे— खोदायजीची मर्जी हाय टर मानस जीवटे नायटर साला मरते— पर टे मला का नाय सांगटे ?

सविता : शिवाय गाडी पण आज जरा बिघडली. ती मेकॅनिकला दाखवायच्या गडबडीत होते.

बॉस : गाडी बिघडली तो मेकॅनिक काय सांगेल ? कपाळ ? मीनी बरोबर सांगितला असता. तेचा काय नाय. गाडी हाय तो लफडा हायच. पण टे समदा मला का नाय सांगटे ?

सविता : मी सांगेन त्यांना आल्यावर-- किंवा मीच जाईन.

बॉस : मार गोली साला-- टू टकलीफ नको कर-- आय वील टेक केअर ऑफ यू— आयमिन युवर हजबंड— फिरूनसी अर्जेंटली टेलिफोनवर वार्ता करण्यास सांग टेला— फरगेट नको कर—!

सविता : पण चेअरमनला जबाब काय देणार ?

बॉस : मार गोली-- जबाब मी देल-- टे लोक काय समजते- आमी साला आमच्या फादरलाबी बनवेल-- टेचा काय नाय- साला ब्रिटिश राजमंदी असा नवता- साला पेपर पायजे म्हंजे पायजे— हे बनीया लोकच्या राजमंदी पैशाचं लफडा नाय पायजे- बाकी कायबी करा- आमचा पेपरवेट साहेब होता. रात्रीचा पेग डुसरे डीवस ऑफीसमंदी येल तो बी उतरेल नाय— साईनं

करेल तो पैला आपुनची इनिशियल बगेल— इनिशियल नाय तो मेला— साला पेपर फेकून देते होता रूमच्या भार— नि उचलेल कोण? अर्ध्या घंट्यामंदी काम खलास— का गेला क्लबवर. पण डिसिप्लीन काय? एफिशीयन्सी काय— क्लीन डेस्क इज साईन ऑफ एफिशीयन्सी. तुमच्या हजबंडला पैल्या माळ्यावरून फेकते होता— चल मार गोली— मला टाईम नाय— ते येल ते मला फोनवर अर्जेंटली वार्ता करायला सांग. गुड नाईट—

सज्जन : पण तुम्ही घरात असाल ना?

बॉस : आमी कुटे जाईल. बायडी पुसेल नाय काय? तुमचा नात्या लोकचा डोकाच उलटा— मार गोली— गुड नाईट. गुड नाईट टू यू फादर. [ जातो. ]

म्हातारा : हे कोण?

सविता : हे यांचे बॉस—

म्हातारा : यांचे म्हणजे?

सविता : म्हंजे— यांच्या भावाचे. त्यांचं नाव एस्. एम्. च आहे.

म्हातारा : तुम्ही त्याची बायको काय, म्हटल्यावर तुम्ही 'हो' म्हणालात.

सविता : मग काय म्हणणार?

म्हातारा : हे तुम्ही मला विचारता? आनंद आहे!

सज्जन : नाही पण हे बघा— त्याने तुम्हाला पण विचारलं, तुम्ही त्यांचे फादर काय म्हणून—

म्हातारा : पण मी 'नाही' म्हटलं—

सज्जन : ही 'हो' म्हणाली एवढंच— पण म्हणजे त्याचे काय आहे— की तो माणूस होता तापलेला— आणि त्यात पारशी— म्हणून म्हणाली आपली— 'मार गोली' नाही तर फुकट प्रकरण वाढायचं—

म्हातारा : छान बनवताय तुम्ही मला. पण लक्षात ठेवा, हा म्हातारा तसा बनणार नाही. काही तरी कट दिसतोय तुमचा— ठीक आहे—

सज्जन : नाही हो— कट वगैरे नाही. तो करायला फार हुशार माणसं लागतात म्हणे. शिवाय तो फार गुप्त पण असतो. तो आम्ही काय करणार? तुम्ही विश्वास ठेवा आमच्यावर.

म्हातारा : का— ?

सज्जन : तो प्रश्नच आहे. पण माणसानं माणसावर विश्वास ठेवावा आपला.

शिवाय तुम्ही मघाशी तयार होताच—

म्हातारा : तेव्हा होतो— आता नाही— का म्हणून विचारा—

सज्जन : का— ? (एवढ्यात बेल वाजते. सविता दार उघडते. दारात मैत्रीण.)

मैत्रीण : अय्या! आज खरंच सूर्य पश्चिमेला उगवला. आज तू एकटी कशी? हनीमून संपला वाटतं? मिस्टर कुठे गेले?

सविता : ए, चावटपणा करू नको. आत चल बघू तू. सगळं सांगते तुला.

सज्जन : मला थोडं पाणी दे— थंडगार.

सविता : देते हं— चल ग.

मैत्रीण : आत नको बाई. आत बसले की बसलेच. मग वेळेचं भान नाही राहणार.

सविता : तू चल बघू. (तिला आत ओढीत नेण्याचा प्रयत्न करते. पण ती जात नाही. 'आत नको ग प्लीज' असं म्हणत तिथंच बसते. सज्जन नि सविता दोघांचीही स्थिती केविलवाणी.)

मैत्रीण : (म्हाताऱ्याकडे पाहात) अय्या! हे कोण?

सज्जन : मी— मी तुमची ओळख करून देतो हं, हे— हे सविनय कायदेभंग-सविनय कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतलेले— शिवाय तर्कशास्त्राचे प्राध्यापक होते. सहज इकडे आले होते. नि या…

मैत्रीण : मी मृदुला कोकीळकंठी. माझे मिस्टर ब्लॉकवेजमध्ये सेल्स— मॅनेजर आहेत. सायनला फ्लॅट आहे— आमचा. ओनरशिपचा. हल्लीच घेतलाय वर्षापूर्वी. फिफ्टीसेव्हनला पडला.

म्हातारा : असं का?

मैत्रीण : तसा थोडा महागच पडला. पण जागा मात्र छान आहे. फर्स्ट फ्लोअरला, कॉर्नरला आहे. सातशे सव्वीस स्क्वेअर फूट आहे. म्हटलं मनाजोगा आहे, घेऊन टाकावा. पैशाचं काय?

म्हातारा : बरोबर आहे.

मैत्रीण : तुम्ही सविनय कायदेभंगात भाग घेतलात म्हणालात तर एक बरं झालं. आम्हांला पण तुम्ही मार्गदर्शन करा. म्हंजे काय आहे, की आम्हीसुद्धा आमच्या महिला मंडळातर्फे काही तरी एक चळवळ करावी म्हणतोय. तसं आमचं मंडळ नेहमी सर्व गोष्टींत पुढं असतं. इंदिरा गांधी— माहीत आहेत

ना ? त्या मुख्य मंत्री झाल्या ना—

सज्जन : प्रधान मंत्री— प्राइम मिनिस्टर.

मैत्रीण : तेच— तर आमच्या मंडळानं पहिली तार केली अभिनंदनाची एक्सप्रेस.

म्हातारा : ते ठीक आहे— पण चळवळ कशाबद्दल ?

मैत्रीण : तो प्रश्नच आहे. पण भाववाढीबद्दल म्हणा किंवा साखरकपातीबद्दल म्हणा. किंवा तेलंगण चळवळीला पाठिंबा म्हणून म्हणा किंवा कशाबद्दल ते नंतर ठरवता येईल. तसे प्रश्न काय देशात हजार आहेत. समोरच्या झोपडपट्टीतल्या बायका पण आम्ही सामील करून घेणार आहोत. एक एक रुपया दिला ना, की येतात.

म्हातारा : छान आहे.

मैत्रीण : पण तुम्ही आम्हाला मार्गदर्शन कराल का ? मोर्चा वगैरे अगदी आदर्श निघाला पाहिजे. मी सेक्रेटरी आहे या वर्षी. गेल्य वर्षी त्या गोडांबेबाई होत्या. सगळेच कार्यक्रम आपले गुळमुळीत. त्यांचे मिस्टर डेप्युटी सेक्रेटरी आहेत. सचिवालयात— त्यांचं प्रमोशन डयू होतं. म्हणायच्या, काही राजकीय कार्यक्रम नको. त्याकरता पुष्कळ पक्ष आहेत— शेवटी प्रमोशन नाहीच मिळालं.

सज्जन : मग त्याबद्दल तरी मोर्चा काढायचा.

मैत्रीण : हं, तर मी काय म्हणत होते. मोर्चा वगैरे अगदी आदर्श निघाला पाहिजे. हल्ली आपले ऊठसूट सगळेच मोर्चा काढतात. तसं नको. मोर्चा काढायचा— काळ्या घोड्याजवळ पोलिसांनी अडवायचा— मग साखळी तोडायचा अयशस्वी प्रयत्न— शेवटी पुढाऱ्यांची भाषणं. असं नको. त्यापेक्षा मला वाटतं काळ्या घोड्यापासूनच आपण मोर्चाला सुरुवात करावी. वाहनं, ड्रिंक्स वगैरेची सोय होईल मंडळाकडून. आणि विसर्जित कुठं करायचा ते आधी जाहीर करायचं नाही.

सज्जन : आयडिया छान आहे. आपले दमले की थांबले. पण तसं चालत नाही.

मैत्रीण : का ?

सज्जन : का काय ? नाही चालत. कायद्याचे पालक ते.

मैत्रीण : नाही तर असं करायचं की ट्रिपला म्हणून जायचं मलबार हिलवर आणि एकदम आपला मोर्चा काढायचा. मुख्य मन्त्र्याच्या बंगल्यावर.

सज्जन : हां– ही आयडिया बरी आहे. वसंतराव तसे सज्जन गृहस्थ आहेत. ते तुम्हांला चहा वगैरे देतील. शिवाय तुमच्या मागण्यांना हार्दिक पाठिंबा पण देतील.

मैत्रीण : मग आपण मार्गदर्शन करायचं हं. मी गाठीन तुम्हांला आमचं ठरलं म्हणजे. अय्या ही कुठं गेली ? मला उशीर होतोय. ए, मी परत येईन ग यांना भेटायला नि तुला पण (सविताच्या हातातून पाण्याचा ग्लास घेते व पिते.) थँक्स. हो— पण एक राहिलंच. यांची नाही ओळख करून दिलीस.

सविता : चल चल— तुला उशीर होतोय. मग देईन हं ओळख करून.

(तिला जवळ जवळ घालवते. सज्जन व सविता निःश्वास टाकतात.)

सविता : (सावरीत) ही माझी मैत्रीण. लहानपणापासूनच जरा वात्रट आहे. मुद्दामच म्हणाली हे कोण म्हणून—

म्हातारा : तसं वाटलं नाही.

सज्जन : अहो, खरंच गंमत केली तिनं. गेली तीन वर्षे ओळखतोय ना मी ? लग्न झाल्यापासून.

म्हातारा : पुन्हा पुन्हा सांगताय ? शिवाय आल्याबरोबर ती म्हणाली 'आज तू एकटी कशी' म्हणून.

सज्जन : त्याचं काय आहे. पण नको. तुम्हांला शंका आहे तर, तुम्ही थांबा. शिवाय आमचा पण आज काही कार्यक्रम नाही. जरा वेळ बरा जाईल. ए, तुला मघाशीच म्हटलं, जरा चहा कर यांच्याकरता.

म्हातारा : नको—

सज्जन : का हो ?—

म्हातारा : मी चहा घेत नाही सारखा—

सज्जन : मग कॉफी ?—

म्हातारा : नको—

सज्जन : घ्या हो— नाही तरी तुम्ही आमच्याकडे कशाला आला असता ? मुलीच्या निमित्तानं आलात. तर कॉफी घ्याच. शिवाय सिच्युएशन काय मस्त आहे. अजून दोन तास तुम्ही पहारा देत बसणार— वॉचमनसारखे—ते काम कठीण. काहीच करायचं नाही. नुस्तं पहात बसायचं— डुलकी वगैरे आली तर लगेच 'डिसमिस्.' स्लीपिंग ऑन ड्यूटी म्हणून— तुम्ही कॉफी

घ्या– जरा बरं वाटेल–

म्हातारा : मी आपला आभारी आहे. पण एवढं सगळं करण्यापेक्षा मला घरात बघायची परवानगी दिलीत तर दोघांचाही त्रास वाचेल. तसा माझा तुमच्यावर विश्वास आहे–पण स्वतःवर जास्त आहे. शिवाय प्रश्न मुलीचा आहे. मुलीचा बाप झाल्याशिवाय नाही कळणार–

सज्जन : खरं म्हणजे मी तुम्हाला घर बघायला परवानगी दिली असती—पण प्रश्न तत्त्वाचा आहे. अण्णा नेहमी म्हणत "सगळं सोडा—पण तत्त्व सोडू नका." अण्णा म्हणजे आमचे वडील.

म्हातारा : ते बरोबर आहे—

सज्जन : म्हंजे उद्या कोणीही येईल नि म्हणेल– (एवढ्यात बेल वाजते. सज्जन दार उघडतो. दारात सदानंद एका वयस्क माणसाच्या वेषात.)

सदानंद : सदानंद झुंजार इथंच रहातात ?

सज्जन : हो— या ना आत–

सदानंद : आपण त्यांचे भाऊ काय ?

सज्जन : नाही—मी त्यांच्या भावाचा भाऊ—

सदानंद : म्हंजे आपण सदानंदराव– छान. मी आपल्याला पाहिलेलं नाही पूर्वी. म्हणून घोटाळा झाला–

सज्जन : नाही–काही हरकत नाही— पूर्वी पाहिलेल्या माणसांचासुद्धा घोटाळा होतो. आपलं काय मत होतं ? –

सदानंद : आपण गंगाधरराव देशपांड्यांना ओळखता का ?

सज्जन : नाही बुवा– पण आमचे वडील सांगायचे त्यांच्याबद्दल, कर्नाटक सिंह वगैरे होते ना– ?

सदानंद : ते नव्हे–

सज्जन : ते नव्हे— ? मग गंगाधरराव कोण बुवा— ?

सदानंद : तुम्ही ओळखत नाही गंगाधररावांना— कमाल आहे—

सज्जन : त्यात कमाल कसली— आत्ता मी कोण म्हणून विचारलं तर मलाच ओळख पटायची नाही— माणूस कधी कधी नाही ओळखत स्वतःलासुद्धा—

सदानंद : ते बरोबर– पण ते म्हणाले की, नुस्तं नाव सांगितलं की झालं–

सज्जन : असं ? असं म्हणाले ? हिला विचारून बघतो हं— ए, जरा बाहेर

ये बघू– तू यांना ओळखतेस काय ? हे गंगाधर देशपांडे–

सविता : काय ? ( एकीकडे– हळू ) काही तरी काय बोलता ? गंगाधरराव म्हंजे उज्जैनचे ना ? ते माझे मामा– ते हे नव्हेत. ( उघड ) काय हो– तुम्हाला मामांची आठवण नाही ?

सज्जन : ( सावरीत ) हां हां. मामासाहेब– बरोबर— गंगाधरराव म्हटल्यावर लक्षात येईना. हां, त्याचं काय ? बोला.

सदानंद : ते गेल्या महिन्यातच तुम्हाला भेटलो होतो म्हणाले.

सज्जन : ( उत्साहाने ) हो– हो भेटले होते ना.

सविता : हो काय ? गेल्या महिन्यात कुठले ? गेल्या वर्षी आले होते मामा.

सज्जन : तेच, गेल्या वर्षीच म्हणायचंय मला—

सदानंद : तुमची तब्बेत बरी नव्हती असं—

सज्जन : माझी ? माझी तब्येत ? ( सविताला खूण करतो. ) हो, म्हंजे काय आहे—

सविता : त्यांना किनई– खोकला झालाय– जवळ जवळ वर्ष झालं— बराच होत नाही. तसं काही सीरियस नाही.

सदानंद : खोकला ? ( खोकतो. ) मग चांगलं औषध घ्या. खोकला फार वाईट. मला पण तोच त्रास आहे. मी आपलं सीतोफलादी चूर्ण आणि शृंग्यादीचूर्ण मधातून घेतो.

सविता : हे पण तेच घेतात.

सज्जन : हो– मी पण तेच घेतो.

सदानंद : छान– म्हंजे बायको चांगली काळजी घेते तुमची.

सज्जन : हो तर– भाची कुणाची ?

सदानंद : वाजले किती ?

सज्जन : सहा दहा.

सदानंद : म्हंजे मला निघायला हवं–

सज्जन : हो– निघा ना. ( चूक लक्षात येऊन ) पण चहा वगैरे घेऊन जा.

सदानंद : नको— चहा नको. मी रात्री जेवायलाच येईन. हो– ही चिठ्ठी द्यायची राहिली. ( चिठ्ठी देतो. ) हे कोण ?

सज्जन : हे ? हे आपले असेच आहेत ओळखीचे— आले होते सहज. म्हटलं जरा बसा.

सविता : कायदेभंगाच्या गंमती सांगतायत एकेक.

सदानंद : छान.

म्हातारा : (वैतागलेला) हे बघा– खोटं बोलू नका. मला खोटं बिलकूल खपत नाही. हे पहा मिस्टर.

सदानंद : भुजंगराव– माझं नाव.

म्हातारा : हे पहा भुजंगराव— यांची माझी तशी ओळख नाही. माझी तरुण अविवाहित मुलगी इथं आलेली मी पाहिली— तिला शोधीत मी इथं आलोय. हे लोक म्हणतात ती इथं नाही म्हणून.

सदानंद : मग नसेल.

म्हातारा : पण मी तिला येताना पाहिली. मी माझ्या मुलीला ओळखतो.

सदानंद : अशी खात्री देऊ नका. हल्ली बायकोसुद्धा नवऱ्याला ओळखीत नाही. काय जावईबापू ?

सज्जन : हो ना.

म्हातारा : तर तुम्ही जरा सांगून पहा. तुमच्या बापूंना–

सदानंद : म्हंजे यांनी खरंच तुमची मुलगी पळवून आणलीय, असं म्हणायचंय काय तुम्हाला ? अरे वा.. म्हंजे, आमचे जावई म्हंजे काय वाटलं तुम्हाला ! आणि काय हो, हे तुम्ही दोघं ऐकून घेता ? दुसरा कुणी असता तर– माफ करा. पण– धक्का मारून बाहेर काढला असता. मी आपला पाहुणा आहे म्हणून– मला उशीर होतोय. मी जातो. हे सामान जरा ठेवतो इथं. (बॅग ठेवून जातात. बॅग बघताच सविता चमकते.)

सविता : बाई... ग–

म्हातारा : काय झालं हो ?

सविता : (सावरीत) काही नाही. अहो, जरा इकडे या. (हळूच सज्जनाला) ही बॅग अगदी यांच्या बॅगसारखी आहे— मला वाटतं—

सज्जन : अहो, बॅगेसारख्या बॅग्ज पुष्कळ असतात. जरा धीर धरा. (खोटंच हसतो. म्हाताऱ्याच्या लक्षात यावं असं.)

म्हातारा : का हो— काय झालं ?

सज्जन : काही नाही. हिनं एक विनोद सांगितला. ती मधाची मैत्रीण. (एवढ्यात दारात मैत्रीण.)

मैत्रीण : अय्या, गंमत झाली. भाजी घेईन म्हटलं तर पिशवी नाही. म्हटलं इथंच विसरले असणार— म्हणून आले.

सविता : असं का ? ये आत.

मैत्रीण : नि शिवाय म्हटलं—

सविता : इथं काही म्हणू नकोस. आत ये. ( जवळ जवळ तिला ओढीतच आत नेते. )

म्हातारा : कठीण काम दिसतंय.

सज्जन : कठीण ? अहो महाकठीण. आमच्या लग्नात अशी धमाल केलीन. अशी धमाल केलीन. काही विचारायची सोय नाही.

म्हातारा : असं का ?

सज्जन : तर हो !

म्हातारा : काय केलंन् ?

सज्जन : म्हटलं ना विचारायची सोय नाही म्हणून. भयंकर धमाल. तेव्हापासून मी तर धमालबाईच म्हणतो. नवरा मात्र जंटलमन हं. घरात आहे की नाही कळायचं नाही. सगळा कारभार इंदिराबाईकडे. तशी एकदम पॉवरफुल बाई. ( एवढ्यात दोघी बाहेर येतात. )

मैत्रीण : कोण हो ?

सज्जन : आपल्या इंदिराबाई हो-

मैत्रीण : हं हं. अय्या ! पण आय ॲम सॉरी हं. खरंच सॉरी.

सज्जन : कशाबद्दल ?

मैत्रीण : मी आपल्याला प्रथम ओळखलंच नाही.

सज्जन : ओ, आय सी, आता ओळखलंत ना ?

मैत्रीण : इश्श, आता न ओळखायला काय झालं ? पण खूप बारीक झालात हो तुम्ही.

सज्जन : असेल असेल. सध्या जरा तब्येत बरी नसते मधून मधून.

मैत्रीण : म्हणूनच ओळखलं नाही. एकदा वाटलं तुम्हीच असाल. पण परत म्हटलं एकदम कसं बोलणार ? मागं एकदा असंच झालं. म्हंजे अगदी अस्संच नाही, पण अस्संच आम्ही गेलो होतो, प्रदर्शन पाहायला. तिथं एक माणूस दिसला अगदी माझ्या मैत्रिणीच्या नवऱ्यासारखा. मी आपली हाक मारली

'अहो गोविंदराव' 'म्हणून– हे म्हणाले, 'वाटेल त्याला हाक काय मारतेस?' मी म्हटलं 'ते गोविंदरावच नक्की.' पुन्हा हाक मारली. त्या माणसानं मागं पाहिलं. नि तो चक्क थांबला. मी अशी लाजले, अशी लाजले, कसंबसं म्हटलं, 'आय ॲम सॉरी' म्हणून. तर तो माणूस म्हणाला, 'मी गोविंद-रावच आहे.'

सज्जन : अरे वा... गंमतच आहे.

मैत्रीण : गंमत पुढंच आहे. तर मी यांच्याकडे बघितलं. हे म्हणाले, 'आपण चहा वगैरे तरी घेऊ' आम्ही चहा वगैरे घेतला, त्यांनी सर्वांची चौकशी केली. यांची नोकरी, मुलांची प्रकृती वगैरे. बाहेर आल्यावर मी म्हटलं, 'तुमचा स्वभाव खूप बदलला हं. पूर्वी तुम्ही इतके बोलके नव्हतात,' तर ते हसले. मी विचारलं, 'नीरा कशी आहे?' म्हणाले, 'ठीक आहे.' मग घाई असल्यामुळे गेले.

सज्जन : बरं झालं. चला.

मैत्रीण : नाही पण गंमत तर पुढंच आहे. दोनच महिन्यांनी नीरा भेटली मला. म्हटलं, 'कसं चाललंय? गोविंदराव काय म्हणतात?' तर रडायला लागली नि म्हणाली, 'तुला कळलं नाही? ते वर्षापूर्वीच गेले. रेल्वे ॲक्सिडेंटमध्ये.' तर अशी गंमत. मी आपली ऐकतच राहिले. अगबाई, पण भलताच उशीर होतोय. लक्षच नव्हतं घड्याळाकडे. मी निघते हं. तू पण येतेस काय कोपऱ्यापर्यंत?

सविता : येते. थांब जरा. भाजी घेऊन येईन येताना. नाही तरी एकटीला उतरायला कंटाळा येतो. काय आणू हो भाजी?

सज्जन : मला काय विचारतेस? तुला वाटेल ती आण. (दोघी जातात.)

म्हातारा : तुमच्याकडे वाचायला काही आहे काहो?

सज्जन : हो. काय पाहिजे? कादंबरी— गोष्टी?

म्हातारा : छे— छे— तसलं काही नको. काय चटोर लिहितात अलीकडे–?

सज्जन : तुम्ही वाचता काय— ?

म्हातारा : शी– शी—वाचतंय कोण असलं फाजील! आपली परीक्षणं वाचतो.

सज्जन : नाही, पण तुम्ही वाचाच— हं, हे घ्या. भाऊ पाध्येचं आहे, वासूनाका—

म्हातारा : ते तर मुळीच नको—

सज्जन : का हो— ? वाचून तर बघा. हे लोक दुसरं काही मागत नाहीत. मागतात फक्त स्वातंत्र्य— म्हणतात शब्द फाजील, अश्लील वगैरे नसतात. आपण त्यांना तसं बनवतो. तुम्ही वाचून बघा. सवयीनं फाजील वाटणार नाही.

म्हातारा : नको— आता या वयात असल्या सवयी नकोत. त्यापेक्षा पेपर द्या आजचा. ( देतो. एवढ्यात बेल वाजते. )

सज्जन : आता कोण आणखी ? असा वैताग देतात—सुट्टीच्या दिवशी जास्तच. [ दार उघडतो— दारात सदानंद— मिशी, गॉगल लावलेला. ]

सज्जन : कोण पाहिजे ?

सदानंद : एस्. एम्. झुंजार—

सज्जन : मीच— बोला काय काम आहे ?

सदानंद : मी आपल्याकडे दोन-तीन वेळा येऊन गेलो, पण आपण बिझी होतात. मी एक सोशल वर्कर आहे.

सज्जन : चांगलं आहे. पण मला फार वेळ नाही.

सदानंद : नाही. मी आपला फार वेळ घेणार नाही. परत येईन सवडीनं. आता फक्त जुजबी माहिती द्या. जीवनात यशस्वी झालेल्या माणसांची काही माहिती आम्ही गोळा करतोय. तर आपण जीवनात यशस्वी आहात असं आपल्याला वाटतं काय ?

सज्जन : अं ? हो— आत्तापर्यंत एकूण परिस्थितीचा विचार केला तर तसं म्हणायला हरकत नाही.

सदानंद : थँक्यू. आपण विवाहित आहात काय ?

सज्जन : अर्थात. ही जरा बाहेर गेलीय— भाजी आणायला—

सदानंद : ते ठीक आहे. पण आपली पत्नी आपल्याला कशी वाटते ?

सज्जन : छान आहे. का— ?

म्हातारा : तुम्ही जरा पाच मिनिटं आहात ना ? मी एक फोन करून येतो. बसा हं. मला काही बोलायचंय तुमच्याशी—

सदानंद : बसतो ना– ( म्हातारा जातो. ) हं, आपल्या यशस्वी जीवनाचं सूत्र काय ?

सज्जन : मी आयुष्य येईल तसं घेतो. काळाच्या दाढेतसुद्धा हसतमुखानं उभा राहातो.

सदानंद : आपल्यावर कधी खोटं बोलायचा प्रसंग आलाय का ?

सज्जन : हो— पुष्कळ वेळा—

सदानंद : अशा वेळी आपण काय केलंत ?

सज्जन : खोटं बोललो— दुसरं काय करणार ? काय हो, पण तुम्ही अगदी वकिलासारखे प्रश्न विचारताय ?

सदानंद : त्याचं काय आहे की, तात्पर्य काढायचं म्हणजे नीट माहिती हवी— हं, आता एकच प्रश्न— तुमची आणि तुमच्या पत्नीची ओळख पूर्वी— लग्नापूर्वी होती का ?

सज्जन : हो. वुयी वेअर क्लासमेट्स.

सदानंद : थँक्यू. तुम्हाला वेळ नाही— मी पुन्हा केव्हा तरी येईन.

सज्जन : थँक्यू.

सदानंद : त्या म्हातारबुवांना सांगा—

सज्जन : नाही— मी नाही सांगणार— तेवढं तुम्हीच सांगा— समोरच्या इराण्याकडे असतील.

सदानंद : बरं, पण हा हॉल फार छान सजवलाय हो, ही आवड ?

सज्जन : माझीच— तशा आमच्या आवडी एकच आहेत.

सदानंद : ओ, आय सी. पण काय हो, या चित्रांच्या जागा चुकल्यात असं नाही वाटत ?

सज्जन : नाही बुवा— मला अशीच लावलेली आवडतात—

सदानंद : बरंय— तुम्ही बरीच माहिती दिलीत— थँक्स.

सज्जन : (एकदम आठवून) तुम्ही सोशल वर्कर आहात ना ?

सदानंद : हो— का ?

सज्जन : मग मला थोडी मदत करा— मी जरा गांगरून गेलोय—

सदानंद : बोला— काय करू ?

सज्जन : त्याचं काय आहे— मी एका लफड्यात सापडलोय—

सदानंद : लफड्यात... ?

सज्जन : हो– आणि त्यातून सुटायचा काही मार्ग दिसत नाही. म्हंजे काय

म. ग्रं. सं. ... 
क्र. 90103 ..........
दि. ...7124.........

आहे-- थोडक्यात सांगतो-- मी माझी बायको म्हटलं ना— भाजी आणायला गेलीय ती- ती माझी बायको नाही--

सदानंद : अस्सं... ?

सज्जन : होय ना— आणि तेच तर सगळं लफडं होऊन बसलंय--

सदानंद : अच्छा, लफडं आहे— ?

सज्जन : हा म्हातारा होता ना, त्याला वाटतंय् त्याची पोरगी आम्ही इथं लपवून ठेवलीय. म्हणून तो इथं सत्याग्रह करतोय.

सदानंद : पण पोरगी नाही ना इथं ?

सज्जन : आहे ना— तीच तर आणखी दुसरी भानगड आहे—

सदानंद : अच्छा— आणि ही भानगड त्या बाईला माहिती आहे ? भाजी आणायला गेलीय तिला-- ?

सज्जन : हो-- ती मला मिळून आहे, म्हणूनच अजूनपर्यंत म्हाताऱ्याला आम्ही थोपवून धरलंय-- आम्ही नवरा बायको आहोत असं सांगून. आता तो तुम्ही इथं आहात म्हणून पोलिसला फोन करायला गेलाय- आणि पोलिस आले की सगळं बिंग फुटणार—

सदानंद : नि त्या बाईचा नवरा— ?

सज्जन : तो गेलाय बोरिवलीला— तो आला बायकोची आठवण काढून तर आम्ही मेलोच--

सदानंद : आय सी-- म्हंजे तिच्या नवऱ्याच्या अपरोक्ष हे चाललंय ? चोरून ?

सज्जन : अहो-- त्याला कसं सांगणार-- ?

सदानंद : बरोबर आहे- पण म्हंजे ही जागा— ?

सज्जन : त्याचीच आहे. सगळंच एक प्रचंड लफडं झालंय- माझं डोकं गरगरायला लागलंय— म्हणून तुम्हाला म्हटलं—

सदानंद : डोन्ट वरी. भानगड मोठी आहे- पण मी बघतो काही करता आलं तर- पोलिसमध्ये ओळख आहे माझी- पण ती बाई तुमच्या बाजूची आहे ना ? नक्की- ?

सज्जन : त्याची नको काळजी- ती माझीच आहे समजा-

[ एवढ्यात आतून मधू बाहेर येते. ]

मधू : बाबा कुठं गेले– ?

सज्जन : खाली गेलेत– बहुधा पोलीसला फोन करायला—तू घाबरू नको– यातून काही तरी मार्ग निघेल– वरती बघ आणि त्याच्यावर विश्वास ठेव.

मधू : आता कशावरच विश्वास नाही माझा— बस्स झालं हे सगळं–

सज्जन : अग, असं काय करतेस ? थोडा वेळ धीर धर.

मधू : कशाला—? तुमच्या सगळ्या भानगडी बघायला ? किती बनवणार आहात मला– ?

सज्जन : तुला काय बनवलं मी ? उगीच चिडून काही तरी बोलू नकोस.

मधू : मी काही तरी बोलते काय ? आत्ताच तुम्ही यांना म्हणालात ना, की ती माझीच म्हणून समजा— मी ऐकलंय दाराआडून–

सज्जन : अग, पण—

मधू : अग पण काय ? मला वाटलं तुम्ही नाटकच करताय... म्हणून काही बोलले नाही— मला काय दुधखुळी समजता ? किती दिवस आहे ती कामाला ? पुष्कळ दिवसांची ओळख असल्याशिवाय अस्सं वागणारच नाही— चक्क तुमची खरंच बायको असल्यासारखी...

सज्जन : आता काय सांगू ? तू प्लीज जरा गप्प बस– काही तरी गैरसमज करून घेऊ नको. फुकट यांचा पण गैरसमज व्हायचा... आत जा बघू.

[ तिला आत ढकलतो. ]

सदानंद : काय हो— या का एवढ्या चिडल्या ?

सज्जन : काय सांगणार ? म्हटलं ना सगळंच लफडं आहे म्हणून— तिला वाटतंय की इथल्या मोलकरणीशी माझी भानगड आहे म्हणून...

सदानंद : म्हंजे इथं मोलकरीण आहे ?

सज्जन : नाही हो— त्याचं काय आहे...

सदानंद : नका, सांगू नका— कळलं एवढं पुष्कळ झालं— मी जातो— आणखी ऐकलं तर काय होईल कुणास ठाऊक ? [ जातो. ]

सज्जन : ( मधूला हाक मारतो. ) मधू... ए मधू... ( ती येते. ) बघ तुला जमतंय का जायला— हीच वेळ आहे— तू आताच सटकू शकलीस तर—

मधू : मी जाणार नाही—

सज्जन : जाणार नाही म्हणजे ? अग, तुझे वडील– पोलीस– कसं होईल आपलं ?

मधू : काय व्हायचं असेल ते होईल-- त्या कोठडीत बसून माझं डोकं गर-गरायला लागलंय...

सज्जन : अग, असं काय करतेस— मग आपल्या त्या मधुर स्वप्नाचं काय होईल...असा धीर सोडू नकोस— मी सगळं सांगेन तुला नंतर— आता काही शंका काढू नकोस— माझ्या प्रेमाची शपथ आहे तुला— एकदाच ऐक माझं—

मधू : कसली शपथ घातलीस ही ? खरंच तुझं प्रेम आहे का रे ?

सज्जन : होय मधू-- मी केवळ तुझाच आहे— आणि तू माझी— विश्वास ठेव फक्त एकदाच— नि पळ इथून-- तू जर यशस्वीपणे गेलीस तर हा— बाजीप्रभू खिंड लढवील... तू टॅक्सीत बसेपर्यंत... बघ प्रयत्न करून...आपल्या त्या स्वप्नाकरता— ( तो दार उघडतो— तिला जाण्याकरता— दारात आणखी एक माणूस. मधू आत पळते— )

माणूस : मी इन्स्पेक्टर वाकणकर—

सज्जन : या.

( कसंबसं एवढं म्हणतो नि खाली कोसळतो. )

प ड दा

# अंक तिसरा

[ दुसरा अंक संपला तिथंच तिसरा सुरू. ]

वाकणकर : अहो, असं काय करता ? काय होतंय काय ?

~~सज्जन : जरा चक्कर आल्यासारखं वाटतंय— पाणी— पाणी—~~

वाकणकर : अहो, घरात कुणी आहे का ? पाणी आणा लवकर.

[ मधू आतून तांब्याभांडं घेऊन येते. ]

मधू : ~~हे काय ? काय झालं एकदम ? मला वाटलं, कुणाला प्यायलाच पाणी हवंय.~~ ( सज्जनच्या डोक्यावर, तोंडावर, पाणी मारते. तो थोडा शुद्धीवर येतो. ) काय झालं रे एकदम ?

सज्जन : काही नाही मधू. घाबरू नको. येईल त्या प्रसंगाला तोंड दिलं पाहिजे. तू धीर सोडू नको मधू.

मधू : मी नाही धीर सोडीत. ~~पण~~— पण तू असं काय करतोस ? मी सर्वस्वी तुझ्यावर अवलंबून असताना. असं नको रे करू.

वाकणकर : काही विशेष घडलंय का ? मी तुम्हांला काही मदत करू शकतो का ?

सज्जन : तुम्ही काय मदत करणार इन्स्पेक्टरसाहेब ? ठीक आहे. तुमचा काय दोष ?

वाकणकर : मी नाही समजलो.

सज्जन : समजेल तुम्हांला— मी शनीच्या फेऱ्यात सापडलोय हो. राहू–केतूसारखे विरस्या घालतायत भोवती. आता कोणी वाचवू शकणार नाही. त्या रंगबेरंगी स्वप्नील काचेला तडा गेलाय. सप्तरंगी इंद्रधनुष्य रावण मोडून टाकणार आहे. तो बघा रावण.

वाकणकर : आणखी थोडं पाणी मारा तोंडावर. नीट शुद्धीवर आलेले दिसत

नाहीत. ( मधू आणखी पाणी मारते. )

सज्जन : मधू– मला तुझं वाईट वाटतं ग. तू उगीच सापडलीस या फेऱ्यात. तुझा काही दोष नसताना– कमळाच्या फुलासारखी तू. नकळत या भुंग्याला अडकवून ठेवलंस. आता भयंकर भोगायला लागणार आहे.

मधू : असू दे माझ्या राजा– मला फक्त तूच पाहिजेस. फक्त तूच. बाकी काही नको. तूच असा वागलास तर मी कुणाकडे पाहू ?

वाकणकर : इकडे बघा– अहो हे सगळं आहे काय ? मला जरा पत्ता लागू द्याल तर बरं होईल. मी आपला उगीचच गरगरतोय तुमच्याबरोबर.

मधू : त्याचं काय आहे, इन्स्पेक्टरसाहेब.

सज्जन : तू नको मधू . मीच सांगतो.

मधू : नको नको मीच सांगते. तुझी अवस्था ही अशी.

सज्जन : माझी काळजी नको करू.

मधू : आणखी कुणाची काळजी करणार मी ? कोण थांबलंय माझ्याकरता ? तू माझं सर्वस्व आहेस—

वाकणकर : जरा कुणी इकडे लक्ष द्याल का ? हे काय चाललंय काय ?

सज्जन : मीच सांगतो मधू– नाही तरी सत्य लपून रहाणार नाहीच. इन्स्पेक्टर-साहेब, आम्ही दोघांनी लग्न करायचं ठरवलंय. आठ दिवसांपूर्वी— शपथ घेतली. आमचं खूप खूप प्रेम आहे हो एकमेकांवर.

वाकणकर : ते दिसतंच आहे. शिवाय शपथ घेतली म्हणजे प्रश्नच मिटला.

सज्जन : नाही इन्स्पेक्टरसाहेब. सगळं इथंच सुरू झालंय. हा सगळा चोरीचा मामला आहे. हिच्या आईवडिलांना कळलं ना, तर आमची कंबक्ती—

वाकणकर : का ? यांची जात कुठली ?

सज्जन : ते विचारलं नाही अजून मी— पण—

वाकणकर : तुम्हाला एकमेकांच्या जाती माहीत नाहीत ? नि तुम्ही लग्नाची शपथ घेऊन मोकळे ?

सज्जन : तेवढा वेळच नाही मिळाला. तिनं माझ्याकडे पाहिलं नि मी तिच्याकडे पाहिलं. बस्स. मग मनात खूणगाठ बांधली की लग्न करीन तर याच मुलीशी. तिनं पण तसंच ठरवलं. मग भेटलो तेव्हा गाठ पक्की केली.

वाकणकर : मग आता ती सुटणं कठीण. धागा रेशमी असतो म्हणे. तर ते

ठीक. गाठ पक्की झाली. पण मग या इथं कशा आल्या ?

मधू : टॅक्सीनं.

वाकणकर : तसं नव्हे हो.

सज्जन : हां हां. ती, ती चोरून आलीय इथं— तिच्या पाठीमागं एक वाघ पण आलाय. नरमांसभक्षक.

वाकणकर : इथं ?

सज्जन : होय, इथं— ~~ते वाघ जागृत नाही, तिथं असेल तो पहारा देत. गुरु~~ ... ~~गुरू~~ त्याला जर कळलं ही इथं आहे म्हणून तर मग—

वाकणकर : वाघाला ?

सज्जन : होय— त्यालाच—

वाकणकर : तुमची आलंकारिक भाषा मला समजत नाही.

सज्जन : त्यात आलंकारिक काही नाही. सत्य आहे ते एक. निर्भेळ ~~स्वच्छ~~. ~~मला वाटायचं नेहमी की सत्य मेलेलं आहे म्हणून सगळेच पुढारी, लेखक त्याची फार स्तुती करतात. म्हणून वाटायचं, की ते नक्की मेलेलंच असणार. त्या शिवाय कोण स्तुती करील ? पण नाही.~~

वाकणकर : ते सत्याचं जाऊ दे— त्या वाघाचं काय ?

सज्जन : सांगतो— ~~जरा~~ पाणी ~~आ~~. ( मधू पाणी देते. )

मधू : तू नको रे बोलू. फार त्रास होतोय तुला. मी सगळं सांगते त्यांना.

सज्जन : थांब मधू ! इन्स्पेक्टरसाहेब— आता तुम्हीचा वाचवा आम्हाला. तुम्हीच व्हा परमेश्वर, भक्तांचा धावा ऐकणारे. नाही तर जीव द्यायचा एकच मार्ग उरेल— तिथून खाली उडी टाकायची किंवा विष घ्यायचं. म्हणून म्हणतो, वाचवा...काका. ( पुन्हा बेशुद्ध पडायच्या मार्गावर. )

मधू : नको रे बोलू तू राजा. असं काय करतोस ? स्वस्थ पड तू. इन्स्पेक्टर, खरंच वाचवा हो आम्हाला. आमचं सर्वस्व तुमच्या हातात आहे. ती दोरी जरा सैल सोडा. घट्ट फास नका घालू

वाकणकर : ( काही न समजता ) सोडली सैल. आता जरा मला नीट सांगा.

मधू : इन्स्पेक्टरसाहेब, मी चोरून इथं आलेय. नि आमचे वडील म्हंजे माझे वडील पण आलेत पाठोपाठ. त्यांना वाटतंय मी नक्की इथं आहे.

वाकणकर : मग तुम्ही इथं नाही काय ?

मधू : तसं नाही हो—पण मग आमच्या त्या उराशी बाळगलेल्या स्वप्नाचे अगदी तुकडे तुकडे होतील. ~~एखाद्या काचेच्या~~...

वाकणकर : आलं लक्षात...

मधू : आलं ना ? आणि म्हणून आम्ही एक भानगड करून ठेवलीय.

वाकणकर : आणखी भानगड ?

मधू : नाही, तसं नाही— म्हंजे काय आहे त्याचं, की हे सज्जन वाटावे ना, म्हणून इथं मोलकरीण आहे ना, तीच यांची बायको म्हणून सांगितलंय यांनी वडलांना.

वाकणकर : सज्जन वाटावे म्हणून ?

मधू : हो— का ? हां हां. तसं नव्हे; म्हंजे त्यांना खात्री वाटावी की मी इथं नाही— म्हणून—

वाकणकर : पण हे खरंच कोण आहेत ?

मधू : सज्जन ...

वाकणकर : मला नीट सांगा— मी काही तुमचे वडील नाही.

मधू : अहो, हे खरंच सज्जन आहेत.

वाकणकर : अच्छा ठीक आहे— तुम्ही असं करा. जरा आत बसा. मी बघतो काय करायचं ते.

मधू : आणि हे ?

वाकणकर : त्यांच्याकडे पण बघतो. तुम्ही चला आत. नाही तर तेवढ्यात वाघ...

[ ती आत जाते. ]

वाकणकर : ( सज्जनला ) मिस्टर—

सज्जन : ( हळूच डोळे उघडतो ) येस इन्स्पेक्टर.

वाकणकर : जरा इथं एक सही करता का ?

सज्जन : नको प्लीज. असल्या लफड्यात नका गुंतवू—

वाकणकर : त्यात काही लफडं नाही—तुम्ही वाचून बघा.

सज्जन : नको, तसं काही करू नका. मी पाय धरतो तुमचे. पण हा सहीचा फास नको. मी सगळं काही खरं सांगतो. काही लपवून ठेवीत नाही.

वाकणकर : अहो, असं काय करता ? नुसती सही—

सज्जन : नको— हे बघा, नुसत्या कल्पनेनंच मला चक्कर येतेय. पाणी— पाणी—

वाकणकर : ~~तुम्ही जरा प्या—हे पाणी घ्या.~~

सज्जन : थँक यू, सर.

वाकणकर : हं, आता बघा नुसती सही करवेल का?

सज्जन : नको इन्स्पेक्टरसाहेब, जरा चक्कर आल्यासारखं झालं म्हणून, नाही तर केव्हाच खरं सांगितलं असतं. आता सांगतो—ईश्वरसाक्ष खरं सांगेन—खोटं सांगणार नाही—तुम्हाला तिनं सांगितलं ते बहुतेक खरं आहे.

वाकणकर : बहुतेक म्हंजे?

सज्जन : माझं तिच्यावर खूप प्रेम आहे. ती इथं चोरून आलीय. मी तिच्या वडिलांना माझं लग्न दुसऱ्याच बाईशी झालंय म्हणून सांगितलंय.

वाकणकर : म्हंजे मोलकरणीशी ना? स्पष्ट सांगा—

सज्जन : हो—पण नाही—त्याचं काय आहे, की ती मोलकरीण नाही.

वाकणकर : मोलकरीण नाही? मग कोण आहे ती?

सज्जन : ती या घराची मालकीण आहे.

वाकणकर : म्हंजे ! हे तुमचं दुसरं...

सज्जन : तसं नाही हो, ती या घराची मालकीण आहे, पण मी मालक नाही.

वाकणकर : तुम्ही मालक नाही? तरी ती मालकीण आहे? क्वाइट इन्टरेस्टिंग. मग त्या बाई ... तिला मोलकरीण म्हणतात ते का?

सज्जन : ते एक भलतंच लफडं आहे. सगळं सांगायला वेळ नाही, नाही तर...

वाकणकर : आय सी. असं आहे एकूण? आणि म्हणून तुम्ही ती मोलकरीण म्हणून यांना सांगितलंत? राइट?

सज्जन : राईट.

वाकणकर : पण यांच्याशी तरी लग्न करणार ना?

सज्जन : अहो, असं काय करता? म्हणून तर सगळी आफत. आता तुम्हाला सगळं कळलंय. आता आम्हाला वाचवा. जन्मभर तुमचे उपकार विसरणार नाही... (एवढ्यात बेल वाजते.) इन्स्पेक्टरसाहेब—वाघ—

वाकणकर : वाघ? ~~ठीक आहे. काळजी करू न~~का. मी बघतो. पण एवढं नक्की ना की यांच्याशी लग्न ती भानगड? ~~हं, मी उघडतो दार~~. तुम्ही पण तिकडे आत बसा. नि मी इशारा केल्याशिवाय बाहेर येऊ नका. ~~गोष्ट फार नाजूक आहे, तेव्हा प्लीज~~.

[ सज्जन आत जातो. वाकणकर दार उघडतात. दारात सदानंद, सोशल वर्करच्या वेषात. ]

वाकणकर : या—

सदानंद : ~~ते इथले गृहस्थ कुठे गेले ? नि त्या बाई~~ ?

वाकणकर : ~~तुम्ही आधी आत या~~ — हं. कोणते गृहस्थ पाहिजेत तुम्हाला ?

सदानंद : ते—ते—

वाकणकर : गो अहेड. तुमची मुलगी ज्यांच्याबरोबर पळाली असा तुम्हांला संशय आहे ते ? राइट ?

सदानंद : माझी मुलगी ?

वाकणकर : यस, माझ्यापासून लपवू नका. मला सगळं माहीत आहे. मी इन्स्पेक्टर वाकणकर.

सदानंद : आय सी. पण माझी मुलगी वगैरे कुणी नाही.

वाकणकर : नाही ? मुलगी नाही ?

सदानंद : खरंच नाही. तीन वर्षं तर झालीत माझं लग्न होऊन.

वाकणकर : आय ॲम सॉरी. हे वयाचं माझ्या लक्षात नाही आलं. माझ्या मनात आपलं एकच . 'मुलगी पळालेली. बाप शोधात.' आता आलं लक्षात. तुम्ही ते नव्हेत. थँक यू.

सदानंद : कशाबद्दल ?

वाकणकर : आपलं असंच, असू द्या. तर तुम्हाला पाहिजे असलेले गृहस्थ आत आहेत. तुम्ही ओळखता त्यांना ?

सदानंद : ओळखतो म्हंजे ? पण ओळखतो.

वाकणकर : मग ठीक आहे. मी बोलावतो त्यांना. इशारा केल्याशिवाय येणार नाहीत. [ खूण करतो—सज्जन बाहेर येतो. ]

सज्जन : ओ ... तुम्ही ? थँक्यू व्हेरी मच. अगदी वेळेवर आलात. हे पण नि तुम्ही पण. दोन्ही देव एकदम. इन्स्पेक्टरसाहेब, हे एक सोशल वर्कर आहेत. हे पण मला मदत करणार आहेत.

वाकणकर : आय सी. म्हंजे यांना सगळं माहीत आहे.

सज्जन : सगळं म्हणजे तसं सगळं नाही ... पण पुष्कळसं.

वाकणकर : ठीक आहे—मग तुम्ही आतच थांबा. मी यांना विचारतो.

सज्जन : पण...

वाकणकर : प्लीज, [ सज्जन जातो. ] हं, तुमचं नाव काय ?

सदानंद : सदानंद.

वाकणकर : वय ?

सदानंद : तीस वर्षं.

वाकणकर : व्यवसाय ?

सदानंद : नोकरी.

वाकणकर : शिक्षण ?

सदानंद : एम्. कॉम.

वाकणकर : गुड.

सदानंद : पण इन्स्पेक्टरसाहेब— मी तो नव्हे. तुम्हाला हवा असलेला.

वाकणकर : मला तुम्हीच हवेत.

सदानंद : पण...

वाकणकर : पण वगैरे नंतर. जास्त वेळ नाही. माझ्या प्रश्नांची झटपट उत्तर द्या. तुम्हाला काय माहिती आहे याबद्दल ? लवकर सांगा.

सदानंद : खरं सांगू ?

वाकणकर : अर्थात.

सदानंद : काही नाही.

वाकणकर : काय ? तुम्ही त्यांचे मित्र— त्यांना मदत करणार.

सदानंद : नाही— इन्स्पेक्टरसाहेब, माझं ऐकून घ्या, गैरसमज करू नका. पण मला यांची खरंच काही माहिती नाही. तुमच्या आधी थोडा वेळ मी येऊन गेलो तेव्हा त्यांनी मला जे सांगितलं...

वाकणकर : ते नकोय मला. ते माहीत आहे. त्यांनी चोरून लग्न ठरवलंय. सासरा शोधायला आलाय. नि इथल्या मालकिणीशी त्याची भानगड आहे.

सदानंद : काय ?

वाकणकर : यस. त्यांनी ती मोलकरीण आहे असं या होणाऱ्या बायकोला सांगितलंय. नॅचरली— दुसरं काय सांगणार ? पुढं तुम्हांला काय माहीत आहे सांगा. क्विक.

सदानंद : खरंच त्याची इथल्या मालकिणीशी भानगड आहे ?

वाकणकर : का ? तुम्हाला का शंका आली ? माझ्याशी सगळं सांगितलंय त्यांनी.

सदानंद : त्यांनी स्वतः सांगितलं तुम्हाला ?

वाकणकर : यस, मग मी काय खोटं सांगतो तुम्हाला ?

सदानंद : ~~पण इन्स्पेक्टरसाहेब—~~

वाकणकर : ~~बोला — थांबलात का~~ ?

सदानंद : तुम्हाला पण वाटतं याची मालकिणीशी— या घराच्या मालकिणीशी भानगड असेल म्हणून ?

वाकणकर : इथं वाटण्याचा काय संबंध ? ही इज ॲडमिटेड. त्यांनी चक्क कबूल केलंय. शिवाय कुणाचीही भानगड कुठंही असू शकते— कोण कसा गोवला जाईल सांगणं कठीण.

सदानंद : इन्स्पेक्टरसाहेब— मग माझं मरण आता. मी कशाला जगू ?

वाकणकर : काहो ? तुम्हांला काय झालं ? तुमचा काही संबंध आहे का त्या बाईशी ?

सदानंद : होय हो—

वाकणकर : आहे ? ~~खरंच~~ ? आनंद आहे— म्हंजे बाई खरंच ग्रेट असणार.

सदानंद : इन्स्पेक्टर—

वाकणकर : थांबा तुम्ही— पुढे बोलू नका— माझ्या लक्षात येतंय सगळं. ~~तुम्ही बस इकडे बसा. या बोलीत.~~ मी सगळं कंट्रोलमध्ये आणतो. खरंच कमाल आहे. मी नेहमी इकडे फिरतो, पण मला कल्पनासुद्धा नव्हती की इथं असं काही असेल—

सदानंद : इन्स्पेक्टरसाहेब—

वाकणकर : जरा गप्प बसा. आता जरा मुळाशी जातोय मी. ~~प्लीज~~, त्या रूम-मध्ये. मी इशारा केल्याशिवाय बाहेर येऊ नका. ~~नंतर सगळं ऐकेन मी तुमचं.~~ [ सदानंद जातो. ] आयला पेरिमॅसनच्या वर ताण झाली. ( एवढ्यात बेल वाजते. बहुधा म्हातारा आला या कल्पनेनं वाकणकर दार उघडतात. दारात मृदुला कोकीळकंठी. )

वाकणकर : तुम्ही काय ? मला वाटलं ते म्हातारे गृहस्थ. ( त्यांना वाटलं ही सविता. )

मृदुला : तुम्ही ओळखता मला ?

वाकणकर : ओ यस.

मृदुला : कसं काय ?

वाकणकर : कसं काय ? दुसरे ओळखतात तसं नाही.

मृदुला : म्हंजे ? आणि मी नाही ओळखलं आपल्याला.

वाकणकर : मी इन्स्पेक्टर वाकणकर—

मृदुला : अय्या— मला वाटलं कुणी साधेच माणूस असाल म्हणून.

वाकणकर : साधा म्हणजे ?

मृदुला : म्हंजे तुमच्या अंगावर कपडे नाहीत.

वाकणकर : ऑं ?

मृदुला : म्हणून वाटलं की तुम्ही अगदी साधेच असाल— पब्लिक.

वाकणकर : हां हां— मी आपला एकदम हा झालो.

मृदुला : पण काय हो ? तुम्ही मला कसं काय ओळखलंत ?

वाकणकर : कसं काय ? ~~आता काय सांगणार~~ ? आमची नजर आम्हाला बरोबर सांगते कोण काय आहे ते.

मृदुला : ते बरोबर आहे म्हणा—

वाकणकर : शिवाय इथंच तुमच्याशी संबंधित माणसं भेटली. त्यांनी कल्पना दिली तुमच्याबद्दल.

मृदुला : म्हंजे ते म्हातारे गृहस्थ भेटले तुम्हाला ?

वाकणकर : कोण म्हातारे गृहस्थ ? त्या मुलीचे वडील ?

मृदुला : हो— का ?

वाकणकर : ते नाही भेटले अजून— ते पण आहेत का यात ?

मृदुला : हो तर— अहो तेच तर मुख्य मार्गदर्शक— बाकी तुम्हाला कळेलच म्हणा.

वाकणकर : आनंद आहे, आता पुढं काही सांगू नका. मी विचारतो तेवढ्या प्रश्नांची उत्तरे द्या.

मृदुला : विचारा.

वाकणकर : तुमचं लग्न झालंय का ?

मृदुला : हो तर— का ?

वाकणकर : या ज्या काही तुमच्या ‘ अॅक्टिव्हिटीज ’ चाललेल्या आहेत त्यांना तुमच्या मिस्टरांची संमती आहे का ?

मृदुला : हो— त्या शिवाय कशा करणार ?

वाकणकर : आहे ? आनंद आहे. आता मला एकच सांगा, आजची ही गोष्ट तुमच्या मिस्टरांना ठाऊक आहे ?

मृदुला : नाही. का ?

वाकणकर : ठीक आहे. आता ते म्हातारे गृहस्थ कुठं आहेत तेवढं सांगा.

मृदुला : मी आले तेव्हा पायरीवर बसलेले होते. मला येताना पाहिल्यावर उभे राहिले, बहुधा येतीलच एवढ्यात. पण मी जाते.

वाकणकर : तुम्ही कुठं चाललात ?

मृदुला : खाली माझी एक मैत्रीण उभी आहे. ती म्हणाली, जरा वरची परिस्थिती बघून ये, म्हणून आले. मला अडवू नका.

वाकणकर : मी कशाला अडवू तुम्हाला ?

मृदुला : एक विचारू का इन्स्पेक्टरसाहेब ?

वाकणकर : एक काय ? वाटेल ते विचारा, पण लवकर—

मृदुला : आम्ही हे जे ठरवलंय करायचं ते ‘ इल्लिगल ’ तर नाही ना ठरणार ?

वाकणकर : ते आत्ता काही सांगता येणार नाही. इट विल डिपेन्ड अपॉन द सरकमस्टन्सेस.

मृदुला : पण तुम्ही मदत कराल ना आम्हाला ?

वाकणकर : ओ, यस. केव्हाही.

मृदुला : जाते मी. थँक्यू. ( जाते. दारात म्हाताऱ्याशी जवळ जवळ टक्कर होते. )

वाकणकर : या. मी आपलीच वाट पहात होतो.

म्हातारा : माझी ?

वाकणकर : हो, त्यात आश्चर्य कसलं वाटलं ?

म्हातारा : आश्चर्य नाही— पण आपण ?

वाकणकर : मी इन्स्पेक्टर वाकणकर.

म्हातारा : छान, मी पण आपलीच वाट पहात होतो.

वाकणकर : माझी ?

म्हातारा : फोन केला. म्हटलं तुम्ही यालच. आलात पण त्यातमुद्धा चातुर्य. साध्या कपड्यात आलात. माणसानं असंच सावध असलं पाहिजे. आणि सरकारी माणसांनी विशेष. कोणत्या वेळी काय होईल सांगता येत नाही. पण तो मुद्दा नाही.

वाकणकर : नाही, पण तुमचं बरोबर आहे.

म्हातारा : असेल, पण तो मुद्दा नाही. आमचा स्वभाव म्हणजे मुद्दयाचं बोलायचं. काय ? एकदा माणूस घसरायला लागला म्हणजे जगात विषय अनंत-- काय ?

वाकणकर : हो ना--

म्हातारा : तर मी काय म्हणत होतो ?

वाकणकर : जगात विषय अनंत...

म्हातारा : बरोबर-- हुशार आहात. तर इन्स्पेक्टरसाहेब, इथं काय चाललंय याची थोडक्यात कल्पना देतो. माझी मुलगी इथं आलेली आहे. मी डोळयांनी पाहिली. ती इथं नाही असं इथले गृहस्थ म्हणतात. यांचं मला घर पाहायला अधिकार नाही. म्हणून तुम्हाला विनंती. मला फक्त माझी मुलगी इथं आहे की नाही पाहून द्या.

वाकणकर : मुलगी केवढी आहे ?

म्हातारा : केवढी म्हणजे ? पाच फूट एक इंच.

वाकणकर : तसं नाही हो- सज्ञान की अज्ञान ?

म्हातारा : वय वर्षं वीस. पण तशी अज्ञानच.

वाकणकर : आँ ? हां हां, गुड. म्हणजे मुलगी मोठी आहे. मग ती कशाकरता इथं आली असेल ?

म्हातारा : ते मला काय माहीत ? हेतू काहीही असू शकेल.

वाकणकर : बरोबर— ते नंतर बघू. या घराबद्दल तुम्हाला काय माहिती आहे ?

म्हातारा : या इमारतीत शिरायचा दरवाजा पश्चिमेला आहे.

वाकणकर : हे पण महत्त्वाचं आहे. पण आता इथल्या माणसांबद्दल ?

म्हातारा : काही माहिती नाही.

वाकणकर : हे तुम्ही खरंच सांगता ?

म्हातारा : खरंच म्हणजे ? आम्ही खोटं बोलायला शिकलो नाही. बोलायचं ते

फक्त सत्यच. मग प्राण गेला तरी बेहेत्तर— असं आम्ही शिकलो.

वाकणकर : ते जाऊ दे. मला जास्त वेळ नाही. लक्षात ठेवा, तुम्ही इन्स्पेक्टर वाकणकरांशी बोलत आहात.

म्हातारा : होय— ते माहीत आहे मला.

वाकणकर : आहे ना ? मग सांगा, तुम्हाला जर या घराची माहिती नाही, इथल्या माणसांची माहिती नाही...तर त्या बाई कसं म्हणाल्या की, त्यांना मार्गदर्शन आहे म्हणून ?

म्हातारा : कोणत्या बाई ?

वाकणकर : हे बघा, उगीच वेड घेऊन पेडगावला जाऊ नका. आता तुम्हाला जाताना दरवाज्यात दिसल्या त्या बाईंना तुम्ही ओळखत नाही ?

म्हातारा : ओळखतो. म्हणजे— तसं ओळखत नाही— पण...

वाकणकर : तुमचं त्यांच्याशी बोलणं झालंय—

म्हातारा : अहो, पण त्याचा माझ्या मुलीशी काय संबंध ?

वाकणकर : आहे. मुलगीचा संबंध आहे. आता तुम्हाला जास्त समजावून सांगायला मला वेळ नाही.

म्हातारा : ते बरं आहे. असलं प्रकरण लवकर निकालात निघेल तेवढं बरं.

वाकणकर : ते मी बघतो.

म्हातारा : इथल्या माणसांचा मला बनवायचा विचार चाललाय. ती बाई पण त्यांना सामील आहे.

वाकणकर : ठीक आहे— मी बघतो. त्यांना बोलावतो बाहेर. बघू या समजुतीनं काही मार्ग निघाला तर— ( खूण करतो—सज्जन येतो. ) या, तुम्ही यांना ओळखता ?

सज्जन : हो ओळखतो... म्हंजे तसं नाही. पण— ओळखतो.

वाकणकर : यांचं म्हणणं आहे की यांची मुलगी घरात आहे.

सज्जन : छे हो. मी मघाशी सांगितलं ना तुम्हाला ? शिवाय तुम्ही घर पाहू शकता. झडतीचं वॉरंट दाखवून—

वाकणकर : यस. वॉरंट पाहिजे. आणि माझ्याजवळ ते नाही— तर—

म्हातारा : इन्स्पेक्टर, यात काही तरी काळंबेरं दिसतंय. तुमचं यांच्याशी आधी बोलणं झालेलं दिसतंय. बरं नव्हे. तुम्ही पब्लिक सर्व्हन्ट— योग्य चौकशी

करायचं तुमचं काम. मी अशी उडवाउडवी करून देणार नाही.

वाकणकर : पण माझं ऐकून तर घ्या—

सज्जन : कोणत्याही प्रसंगात तोल जाऊ देऊ नका. इन्स्पेक्टरसाहेब, कायद्याची गोष्ट. वॉरंट दाखवलंच पाहिजे.

म्हातारा : इन्स्पेक्टर, हे बरं नव्हे— हा सरळ रस्ता नव्हे. निदान तुम्ही असं वागावं अशी अपेक्षा नाही.

वाकणकर : अहो, पण माझ्याकडे वॉरंट नाही. नि त्याशिवाय यांच्या घराची मी झडती घेऊ शकत नाही.

म्हातारा : इन्स्पेक्टर, तुम्ही पब्लिक सर्व्हन्ट आहात. या तुमच्या वागणुकीमुळं भलताच संशय निर्माण होतोय. मला सत्याग्रह करावा लागेल.

वाकणकर : मला दम देता? हा वाकणकर तसा डगमगणार नाही. मी माझं कर्तव्य आणि घेतलेली भूमिका बरोबर जाणतो. तुम्ही उगीच माझं डोकं फिरवू नका. जरा तिकडे आत बसा. मला शांतपणे विचार करू द्या. प्लीज.

म्हातारा : पण—

वाकणकर : पण बीण नंतर. आधी आत. मी सगळं नीट बघतो.

[ म्हातारा आत जातो— सज्जनलाही आत घालवतो. एवढ्यात सदानंद बाहेर येतो. ]

वाकणकर : काय हो? बाहेर कशाला आलात?

सदानंद : इन्स्पेक्टरसाहेब– मला माफ करा. पण तुम्ही एवढं सगळं करताहात, तर तुम्हाला मदत करणं माझं कर्तव्य आहे.

वाकणकर : ते ठीक आहे. मुद्द्याचं बोला. जास्त वेळ नाही.

सदानंद : तुमच्या या चौकशीत उपयोगी असा अत्यंत स्फोटक पुरावा आहे माझ्याकडे—

वाकणकर : स्फोटक?

सदानंद : होय. एकदम स्फोटक—

वाकणकर : अहो, मग अजूनपर्यंत गप्प का होतात? दाखवा लवकर कुठं आहे तो.

सदानंद : ( बॅगेकडे बोट दाखवीत—) ही बॅग...

वाकणकर : यात काय स्फोटक आहे?

सदानंद : आहे. इन्स्पेक्टर, या प्रकरणात ती बॅग भयंकर ठरणार आहे. तुम्हाला जास्त वेळ नाही म्हणून, नाही तर सगळं सांगितलं असतं. तुम्ही त्या माणसाला आणि मालकिणीला ही कुणाची, असं नुसतं विचारा.

वाकणकर : विचारलं, पुढं ?

सदानंद : ती दोघं तुम्हाला थापा मारतील. ती उज्जैनच्या पाहुण्याची आहे म्हणून. त्या बाईला बॅग उघडायला सांगा. की ती खलास !

वाकणकर : असं ? एवढी स्फोटक ? आणि हे तुम्हाला कसं कळलं ?

सदानंद : ते आणखी एक प्रकरण आहे—

वाकणकर : आणखी प्रकरण ? म्हंजे इथं काय चाललंय काय ? (एवढ्यात बेल वाजते. सदानंद आत जायला निघतो. जाता जाता वाकणकरांना सांगतो. "इन्स्पेक्टर, एकच गोष्ट सांगतो. ही बॅग त्या बाईच्या नवऱ्याची आहे." एवढं म्हणून आत जातो. पुन्हा बेल वाजते. वाकणकर दार उघडतात. दारात सविता.)

वाकणकर : या...आपण ?

सविता : मी सविता झुंजार.

वाकणकर : म्हंजे [redacted] नक्की कोण ? इथं जे गृहस्थ...

सविता : त्यांची मी बायको.

वाकणकर : खरी ?

सविता : खरी म्हंजे—?

वाकणकर : म्हंजे तुम्हांला नाही कळणार. मी त्यांनाच बोलावतो. (सज्जनला खूण करतो— सज्जन येतो.)

सविता : हे माझे

सज्जन : हे बघा, पुढं बोलू नका. मी सगळं काही यांना सांगितलंय; हे इन्स्पेक्टर वाकणकर—आणि इन्स्पेक्टरसाहेब, या, या घराच्या मालकीणबाई.

वाकणकर : ओ, आय सी. मग त्या मघाशी आलेल्या बाई कोण ? मी त्यांनाच मालकीणबाई समजलो.

सविता : ती ना ? ती माझी मैत्रीण. तिचा यात काही संबंध नाही तसा.

वाकणकर : तो मला नकोय. [redacted]. मला तुमचे यांचे संबंध कळलेत. आता फक्त मी विचारतो तेवढंच सांगा.

सविता : इन्स्पेक्टरसाहेब, हे प्रकरण जरा जास्तच झालंय. यातून तुम्हीच काही-तरी मार्ग काढा. हे एवढं चिघळेल असं वाटलं नव्हतं.

वाकणकर : जास्त वेळ नाही. तुम्ही मी विचारतो त्या प्रश्नांची उत्तरे द्या. ही बॅग कुणाची आहे ?

सज्जन : ही ना ? हिच्या मामांची. उज्जैनच्या.

सविता : असं काय करता ? मामांची नव्हे त्यांच्या मित्राची. उज्जैनचेच आहेत, ते पण.

वाकणकर : हे बघा— थापा मारू नका. हे म्हणतात मामांची, तुम्ही म्हणता त्यांच्या मित्राची. नक्की कुणाची ?

सज्जन : माझं चुकलं. मी भयंकर गोंधळलोय, म्हणून असं झालं. खरं म्हंजे हिच्या— ~~नव्हे यांच्या~~ मामांच्या मित्राचीच आहे.

वाकणकर : काय आहे त्या बॅगेत ?

सविता : आम्हाला काय माहीत ?

वाकणकर : तुम्हाला माहीत नाही ? आय. सी. म्हंजे अजून तुम्ही माझ्यापासून लपवू इच्छिता. लक्षात ठेवा. बोट बुडायला लागली आहे. सगळेजण बुडणार आहात. फक्त मीच तुम्हाला वाचवू शकतो. कप्तान, तुम्ही माझं ऐकाल तरच वाचाल. मला माहीत आहे ही बॅग कुणाची आहे ते. आत काय आहे ते सुद्धा मला माहीत आहे. अत्यंत स्फोटक पदार्थ आहेत त्यात. तुम्ही उघडून बघा.

सविता : पण याची किल्ली ?

वाकणकर : तुमच्याकडे आहे तीच.

सविता : आमच्याकडे आहे ?

वाकणकर : होय...

सविता : म्हंजे ही बॅग— ~~ही बॉम्ब~~— अग आई ग.

सज्जन : काय झालं हो ?

वाकणकर : राईट, माझा अंदाज बरोबर ठरला. तुम्ही आता आत जा— ~~निघून जा. मला जरा शांतपणे विचार करू द्या.~~ ( जातात. )

[ एवढ्यात म्हातारा येतो. ]

म्हातारा : इन्स्पेक्टर, काय झालं ?

वाकणकर : काही झालं नाही अजून, पण होणार आहे. काही तरी भयंकर.

म्हातारा : भयंकर ?

वाकणकर : होय. महाभयंकर. मी इथं आलो तेव्हा कल्पनासुद्धा नव्हती हे एवढं प्रचंड प्रकरण असेल म्हणून.

म्हातारा : पण माझी मुलगी ?

वाकणकर : मुलीचं काय घेऊन बसलात ? ती आहे.

म्हातारा : आहे— मग वेळ कशाला लावता ?

वाकणकर : ~~काय सांगणार तुम्हाला ?—चल~~ गडबड करू नका. नाहीतर सगळेच काम फसेल. आपल्या सगळ्यांनाच वर जायची वेळ येईल.

म्हातारा : काय, म्हणता काय ?

वाकणकर : मग काय खोटं सांगतो ? ही बॅग बघा. स्फोटक पदार्थांनी भरलेली. मलासुद्धा आता जपून पावलं टाकली पाहिजेत. प्रकरण अत्यंत नाजूक आहे. नॉट टू बी लूज शंटेड. ~~काय ?~~ इथली बाई फार हुशार दिसतेय. पण तुम्ही काळजी करू नका. थोडा वेळ कळ सोसा. जरा आत थांबा. मी बघतो.

[ म्हातारा आत जातो. ]

वाकणकर : (सदानंदाला बोलावतो.) तुमचं बरोबर आहे. तुम्ही सोशल वर्कर. त्याचा फायदा झाला आम्हाला.

सदानंद : म्हंजे नक्की काय इन्स्पेक्टर ?

वाकणकर : तुमचा सल्ला उपयोगी पडला बॅगेचा. बाई जवळ जवळ खलास झाली. तो माणूस पण.

सदानंद : बदमाष आहे तो पक्का.

वाकणकर : ते लक्षात आलंय माझ्या. माणूस बदमाष. बाई लफड्याची. बॅगेत स्फोटक पदार्थ. ~~थँक यू सदानंद—आपलं असंच असू द्या.~~ फार खोल गेलं पाहिजे आता. तुम्ही थांबा. पंचनाम्याकरता तुमचा उपयोग होईल. (सदानंद आत जातो.)

[ सविता नि सज्जन येतात. ]

सविता : इन्स्पेक्टरसाहेब, ही बॅग जरा उघडून पाहू का ?

वाकणकर : नको— तो फार महत्त्वाचा दुवा आहे. त्याला हात लावू नका.

सविता : पण— माझ्या मिस्टरांची अशीच बॅग होती— म्हणून म्हटलं.

वाकणकर : तुमच्या मिस्टरांचीच ती आहे.

सविता
सज्जन : आँ ?

सज्जन : तुम्हांला कसं कळलं ?

वाकणकर : ते विचारू नका.

सज्जन : आणि ते म्हातारे गृहस्थ ?

वाकणकर : ते आहेत. त्यांचं काय ?

सज्जन : काही नाही. पण इन्स्पेक्टर, आमचा जीव अगदी उडून चाललाय.

वाकणकर : त्याला धरून ठेवा. ( एवढ्यात सदानंद व मधू येतात. त्यांनी काही तरी प्लॅन केलेला. )

सदानंद : ( मधूला ओढीत आणतो. ) पुन्हा तोंड दाखवू नकोस— जा चालती हो इथून.

मधू : अहो पण—

सदानंद : शरम वाटत नाही इथं यायला. कालच मारे वचन दिलं होतंस. तुमच्याशिवाय दुसऱ्या कुणाचा विचारसुद्धा करणार नाही म्हणून— आणि हे काय ?

मधू : पण मला खरंच माहीत नव्हतं की हे तुमचं घर आहे म्हणून. हे मला म्हणाले की हे घर त्यांचंच आहे म्हणून.

सदानंद : तो वाटेल ते म्हणेल—

सज्जन : अहो, असं काय करता ? तुम्ही माझे मित्र.

सदानंद : मित्र गेला खड्डयात--

सविता : अहो, असं काय करता ? माझं ऐकून घ्या जरा--

सदानंद : तू कोण ? मी ओळखत नाही तुला--

सविता : अहो, असं काय करता ? मी सगळं सांगते तुम्हाला—

सदानंद : ( मधूला ) तू का आलीस ते सांग, हेच तुझं प्रेम ?

सविता : प्रेम ? हिचं तुमच्यावर ?

सदानंद : का ? त्यात आश्चर्य काय वाटतं ? प्रेम कोणीही कुणावरही करू शकतो.

सज्जन : अहो, तिचं माझ्यावर प्रेम आहे. होय ना मधू ?

वाकणकर : जरा थांबा. तुम्हाला सगळ्यांना झालंय काय ? असे झपाटल्यासारखं काय वागताय ? तुम्ही सगळे नक्की कोण आहात ? मला कशाला-- फिरवता तुमच्याबरोबर ? ( एवढ्यात म्हातारा येतो. )

म्हातारा : इन्स्पेक्टर, ही माझी मुलगी.

वाकणकर : तुम्ही जरा गप्प बसा हो-- माझं डोकं गरगरायला लागलंय. वेड लागेल अशानं. मला काही कळेनासं झालं-- हे कोण, ह्या कोण, हे कोण नि मी कोण-- ( सगळे गडबड करायला लागतात तेवढ्यात बॉस येतो. )

बॉस : ते फरारी झुंजार आला काय ?

सदानंद : यस सर.

बॉस : ~~तू झुंजार ? हे काय~~ ? हे काय नाटक करते घरामंदी ? साला तू लावला काय ? फोन केला ते रूडली जबाब देते-- घरी सांगते नाय कवा येते ते.

सदानंद : त्याचं काय झालं...

बॉस : टेचा काय झाला नाय, म्हणून टपासाला आलो-- टे चेअरमनच्या तिकिटच्या काय-- ? मंडे मॉर्निंगच्या फ्लाइटच्या-- काय केला ?

सदानंद : काढलंय तिकीट.

बॉस : काढला न हाय कुठं ?

सदानंद : हे काय ? ( बॅगमधून तिकीट देतो. )

बॉस : हे टिकीट— हे तिकीट टु जी बॉसचे बॉसची— हे तिकिट टुजी बॅगमंदी टुजी बॅग, टू, ने टुजी बॉस टुजी घरामंदी— अने टुजी बॉसची बॉस जाणार एरोप्लेनमंदी— साला टू काय समजटे काय ? ये फोरास रोड बडलीची सा नंबरची ट्रामची टिकिट समजला काय ?

सदानंद : सर, त्याचं काय...

बॉस : टू वार्टा नको कर ! टू मंडेमॉर्निंगला ओफीसमंदी ये टुला डावटे समदा— टुला फेक्टरीमंधी ट्रान्सफर करते— चल मार गोली. ( जातो. )

वाकणकर : म्हणजे तुम्ही सदानंद झुंजार ?

सदानंद : होय.

वाकणकर : हे तुम्ही आत्ता सांगताय ?

सदानंद : त्याचं काय आहे इन्स्पेक्टरसाहेब—

वाकणकर : ~~प्लीज~~, मला कुणी काहीही सांगू नका—

सज्जन : इन्स्पेक्टरसाहेब– आम्हाला वाचवा–

वाकणकर : मी कुणा कुणाला वाचवू ? जमायचं नाही– तुम्हीच वाचवा मला— मला काही कळेनासं झालंय.

सज्जन : हे बघा — मी सांगतो सगळं–

वाकणकर : तुम्ही तर काही बोलू नका– या घराचा नक्की मालक कोण ?

सदानंद : मी–

वाकणकर : काय हो बाई ? हे तुमचे मिस्टर काय ?

सविता : होय– इन्स्पेक्टर–

वाकणकर : पुढं बोलू नका–

म्हातारा : हे फारच झालं, मला चक्क या दोघांनी आपण नवरा-बायको म्हणून सांगितलं नि आता–

सविता : खरं म्हणजे–

सदानंद : तू बोलू नकोस– सगळं कळलंय मला–

सविता : तुम्हाला काही कळलेलं नाही– म्हणूनच सांगतेय–

सज्जन : तुम्ही कशाला– मीच सांगतो– ही मधू–

मधू : माझं नाव घेऊ नका.

सज्जन : असं काय करतेस मधू–

मधू : मी काही करत नाही– किती फसवलंत मला ? आणखी काय करायचंय ?

सज्जन : पण माझं ऐकून तर घे.

सदानंद : मधू— तू बोलू नकोस– मला पण सगळं कळलंय, आता आपणच या प्रश्नाचा निकाल लावू–

सविता : म्हणजे ? खरंच तुमची एवढी ओळख आहे ?

म्हातारा : हे काय लावलंय तुम्ही ? मी इथं असताना ? इन्स्पेक्टर, मी तुम्हाला बोलावलं नि तुमच्या देखत हे काय चाललंय ?

सदानंद : हे बघा, आम्ही तुम्हाला सांगणारच होतो– आता सांगतो. आमचं एकमेकांवर प्रेम आहे– नि–

सविता : अहो, काय सांगताय तुम्ही ? मी इथं असताना ?

सज्जन : मधू, तू पण काय लावलंयस हे ?

म्हातारा : इन्स्पेक्टर, काही तरी करा लवकर—

वाकणकर : इथं कुणी तरी सही करा, जो मालक असेल त्यानं–

सदानंद : इन्स्पेक्टर, मी तुम्हाला सगळं सांगतो– पण सही नका मागू–

वाकणकर : मला फक्त सहीच हवी ... आणखी काही सांगू नका—

सज्जन : इन्स्पेक्टर, आता तुम्हीच वाचवा—

सविता : इन्स्पेक्टर, तुम्हाला सगळं माहीत आहे—

म्हातारा : इन्स्पेक्टर— ॲक्शन प्लीज—

सदानंद : इन्स्पेक्टर— ( सगळेजण गिल्ला करतात. )

वाकणकर : माझं ऐका — माझं ऐका. [ गिल्ला वाढलेलाच. एवढ्यात दारात हवालदार येतो. हा गिल्ला पाहून जोरात शिटी वाजवतो. सर्व शांत होते. ]

म्हातारा : इन्स्पेक्टर, ही पहा मदत आली. आता वेळ घालवू नका.

वाकणकर : कोण हवालदार ?—मग मी मेलो.

सदानंद : का हो, काय झालं ? इन्स्पेक्टर.

वाकणकर : मला इन्स्पेक्टर म्हणू नका. मी तो नव्हे. तुम्हाला हवा असलेला. मी सॅनिटरी इन्स्पेक्टर आहे. ( सगळेजण आश्चर्यचकित ) इकडच्या गटारांच्या खूप तक्रारी होत्या. नि काही केलं तरी बॉस विश्वास ठेवणार नाही, म्हणून इकडे आलो.

म्हातारा : पण हे आधी का नाही सांगितलंत ?

वाकणकर : आधी केव्हा सांगणार ? मी सारखा सांगतोय, मला फक्त सही हवी म्हणून. पण कोणी ऐकायलाच तयार नाही. काम केल्याबद्दल सही घ्यावी तर मालक संध्याकाळीच भेटणार म्हणून आलो, नि या लफड्यात सापडलो. कल्पना नसताना डिटेक्टिव्ह पुस्तकं वाचण्याची सवय म्हणून सगळं इन्टरेस्टिंग वाटलं. नि त्यातच गुरफटत गेलो. नकळत. शिवाय असा मान एरवी कसा मिळाला असता. म्हणून जरा बरं वाटलं, पण हे आपलं काम नव्हे. आता हवालदार आले—म्हंजे माझं मरणच. तर मला फक्त सही द्या. ~~जो मालक असेल त्याने. किंवा सही~~सुद्धा नको. फक्त जायची परवानगी द्या. ( जायला निघतो. हवालदार अडवतो. )

हवालदार : इथं कंप्लेंट कुणी केली होती पोरगी गायब झाल्याची ?

म्हातारा : मी–

हवालदार : कुणाची पोरगी ?

म्हातारा : माझीच. का ?

हवालदार : कवा गायब झाली ?

म्हातारा : हे बघा हवालदार, तुम्हाला कुणी नि कशाकरता पाठविलं इथं ते, कळेल काय ?

हवालदार : मला झटकेसाहेबांनी पाठवलं. म्हणाले, हा ॲड्रेस— पार्टीला घेऊन ये. मी म्हटलं 'कोनच्या' ? तर म्हणाले गो फर्स्ट. मी आलो.

म्हातारा : मग आता कुणाला नेणार ?

हवालदार : तुमालाच. दुसऱ्या कुणाला ?

म्हातारा : पण माझी मुलगी तशी पळालेली नाही. ती इथंच आहे.

हवालदार : मग खोटी कंप्लेंट देता ? खोटी कप्लेंट दिली की मानूस मेला.

~~सज्जन : मेला ?~~

~~हवालदार : मग ?~~

म्हातारा : हवालदार, त्याचं काय आहे की मी तक्रार केली. कारण मुलीला इथं येताना मी पाहिली, नि हे म्हणाले, ती इथं नाही म्हणून—

सज्जन : होय हवालदार— मी असं म्हटलं— कारण इलाज नव्हता. ती इथं चोरून आली होती. आता सगळं उघड झालंय. यात मीच सगळा दोषी आहे, मला सर्वांनी माफ करा. यांच्या घराचा माळी भेटला— दोस्त बनला. नि त्यानं रस्ता दाखवला— जागा मिळवायचा, नि मी इथं आलो— मी जातो. मधू, हे तुझे वडील. वडील, ही तुमची मधू. सुखानं रहा तुम्ही— सुखानं रहा !

मधू : कुठं जाणार आहेस तू ?

सज्जन : जाईन कुठंही. बांधीन एखादं काड्याच्या पेटीचं घर नि राहीन त्यात हसत— पत्त्यातल्या राजासारखा.

म्हातारा : हे बघा— काड्याच्या पेटीचं घर नका बांधू. कुणीही यायचा नि सिगरेट पेटवायचा.

सज्जन : चेष्टा करू नका— ही वेळ तशी नाही.

मधू : ~~आपण दोघं राहू शकू का त्या घरात ? अंग चोरून तरी ?~~ मी पण येते तुझ्याबरोबर. बाबा, मला आशीर्वाद द्या. ~~मी तुमची अनंत अपराधी आहे. तुम्हाला खोटं बोललेलं आवडत नाही नि मी आजपर्यंत खोटंच बोलले—~~

~~खरंच मला क्षमा करा~~. यांच्याशिवाय मी जगूच शकणार नाही.

सज्जन : पण तुझं यांच्यावर प्रम प्रेम आहे ना ?

मधू : नाही रे ! कसं सागू तुला ? हे चुकून आत आले— मी होते तिथं. मग कळलं आम्हाला तुमचं नाटक. म्हटलं, आपणही करावं नाटक थोडा वेळ, बस्स ! पण मी तुझीच आहे रे !

म्हातारा : मधू—तू जरा थांब— माझ्या सगळं लक्षात आलंय. मला एकच सांग— हे सज्जनराव इथं कसे आले ?

सविता : मी सांगते— ते इथंच राहतात, आम्हाला दोघांना माहीत नसताना— आज मी एकटी राहिले त्यामुळं त्यांची भेट झाली. प्रथम भीती वाटली हे चोर असतील म्हणून. नंतर इंटरेस्टिंग वाटलं म्हणून यांना मदत करायचं ठरवलं. पुढं सगळ्या गोष्टी जसजशा घडत गेल्या तसतसं आम्ही तोंड देत राहिलो. एकदा वाटलं, की तुम्हाला सगळं सांगून टाकावं नि सुटका करून घ्यावी.

म्हातारा : मग का नाही सांगितलंत— मी काय वाघ वाटलो तुम्हाला ?

सज्जन : हो—

म्हातारा : हो काय ? अरे, आम्ही पण तरुण होतो कधी तरी— ~~चला, आता मला जास्त त्रास नको— आपण आपले प्रश्न बाहेर सोडवू— चला हवालदार, मी तुम्हाला सगळं सांग~~तो— चला— किती वाजले ?

सदानंद : आठ.

म्हातारा : आठ ? मग आता आमचे बारा वाजले—चल लवकर मधू— आठ वाजले.

मधू : ~~आठ— अग आई ग~~—

म्हातारा : ~~चला~~, चला नाही तर आमच्या घरी लढाई— हवालदार, चला मी सांगतो सगळं—

सदानंद : ~~अहो ! माझं घड्याळ तरं पंधरा मिनिटं पुढं आहे. काळजी करू नका~~—

म्हातारा : ~~थँक्यू ! आम्ही येतोय परत.~~

सविता : ~~[illegible] ? ( हसतात. )~~

सज्जन : ~~थँक्यू— येतो आम्ही !~~ [ जातात. वाकणकर राहतात. ]

सदानंद : खाली घेऊन झेप ! ( हसत सोफ्यावर बसतात. )

सविता : अं ! हो– खरंच, थ्रीलिंग वाटलं आणि जीव घेणारंसुद्धा— वाटायला लागलं होतं की जग आपलं नाही– इथं फक्त—

सदानंद : पुरे ! ऊठ बघू तू– नाही तर लावशील तास– ( टीपॉयवर ठेवलेली बॅग उचलायला जातो.]

सविता : अहो, त्याला हात नका लावू. त्यात स्फोटक पदार्थ आहे. ( सदानंद दचकतो– मग त्याच्या लक्षात येतं– ते हसतात– ती जवळ येते. ) आय ॲम सॉरी–

वाकणकर : ( पुढे येतो. सोफ्याच्या मागे उभा राहून सहीचा कागद दोघांच्या मधून पुढे सरकवीत ) आता सही करता ?

( दोघं दचकून त्याच्याकडे पाहातात. )

प ड दा


म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय
ग्रं. क्र. ९८०३
दि. [illegible] ष.

IRBK-0119803